१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, मंगळवार २६ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४६, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 246 Marathi - Daily - Pune, 26 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
navakal.in
विशाल दादलानीला 'इंडियन आयडॉल' मधून बाहेर काढलं?
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# पेट्रोल-डिझेल दरांत दहा दिवसांत चौथ्यांदा वाढ
# सामान्यांवर संकट! तेल कंपन्यांचा १३० टक्के नफा

**इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारने देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांत आजपासून पुन्हा वाढ केली आहे. दहा दिवसांतील ही चौथी दरवाढ आहे . आजपासून पेट्रोल प्रति लिटर २.७२ रुपयांची तर डिझेल प्रति लिटर २.८१ रुपयांनी महागले आहे. त्यामुळे महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना आणखी एक जबर झटका बसला आहे. मात्र तेल कंपन्यांना यातून चांगले दिवस आले असून त्यांचा नफा १०३ टक्के झाला आहे. विशेष म्हणजे, पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या निवडणुका होईपर्यंत सरकारने एकदाही दरवाढ केली नव्हती. परंतु निवडणुका संपताच सरकारने दरवाढीचा सपाटा लावला आहे.**



■ नवी दिल्ली

**सरकारने** आज लागू केलेली दरवाढ ही एप्रिल २०२२ नंतरची सर्वात मोठी दरवाढ ठरली आहे. एप्रिल २०२२ पासून देशात इंधनाचे दर जवळपास स्थिर होते. मार्च २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकांपूर्वी केंद्र सरकारने मतदारांना खूष करण्यासाठी पेट्रोल-डिझेल २ रुपयांनी स्वस्त केले होते. १५ मे रोजी तामिळनाडू आणि पश्चिम बंगालसह पाच राज्यांमधील निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर त्याच दिवशी १५ मे रोजी पेट्रोल-डिझेलच्या दरात अचानक ३ रुपयांची वाढ करून केंद्र सरकारने सर्वसामान्यांना पहिला झटका दिला. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांत १९ मे रोजी पुन्हा पेट्रोलची ८७, तर डिझेलची ९१ पैशांची वाढ केली. तिसऱ्यांदा २३ मे रोजी पेट्रोल ८६ पैशांनी तर डिझेल ९१ पैशांनी महाग झाले होते.

**विविध शहरांमधील दर**

| | पेट्रोल | डिझेल |
|---|---|---|
| मुंबई, पुणे | १११.२१ रुपये | ९७.८३ रुपये |
| नागपूर | ११२.०१ रुपये | ९८.७८ रुपये |
| ठाणे | १११.६१ रुपये | ९८.२२ रुपये |
| नाशिक | ११२.०२ रुपये | ९८.६६ रुपये |
| कोल्हापूर | ११२.० ८ रुपये | ९८.८४ रुपये |
| चेन्नई | १०७.७७ रुपये | ९९.५५ रुपये |
| कोलकाता | ११३.५१ रुपये | ९९.८२ रुपये |
| दिल्ली | १०२.१२ रुपये | ९५.२० रुपये |

इंधन दरवाढीवरून आज काँग्रेस नेते खा. राहुल गांधी यांनी एक्स पोस्ट करून पंतप्रधान मोदींवर पुन्हा निशाणा साधला. १५ मेपासून पेट्रोल-डिझेलच्या किमतीत कशी वाढ होत गेली याचा तपशील राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये देत म्हटले की, महंगाई मानव मोदींनी पुन्हा हल्ला केला आहे. केंद्र सरकारकडून पेट्रोल आणि डिझेलचे दर टप्प्याटप्प्याने वाढवले जात आहेत, जेणेकरून लपूनछपून खिसा कापला जावा. मी अनेक महिन्यांपासून देशात आर्थिक संकट येण्याचा इशारा देत आहे. पण, पंतप्रधान मोदी निवडणुकांमध्ये मग्न होते. निवडणुका संपताच देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात एकूण ८ रुपयांनी वाढ करण्यात आली. यापुढेही इंधनाच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. निवडणुकांमध्ये आश्वासने द्यायची आणि उर्वरित काळात जनतेच्या खिशावर वार करायचा, हेच मोदी सरकारचे एकमेव काम आहे.

आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनीही सरकारवर टीका करत म्हटले की, गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात साडेसात ते आठ रुपयांनी वाढ झाली आहे. रशिया आणि इराण आम्हाला स्वस्तात आणि पुरेसे तेल विकायला तयार आहेत. पण आपण त्यांच्याकडून खरेदी का करत नाही? मोदींची अशी काय मजबुरी आहे?

काँग्रेस नेते मनीष तिवारी यांनी सोशल मीडियावर आकडेवारीच देत म्हटले की, तीन सरकारी पान ७ वर

## युद्ध थांबण्याच्या अपेक्षेने शेअर बाजारात मोठी वाढ

**मुंबई** - अमेरिका आणि इराण यांच्यात युध्दसमाप्तीचा करार दृष्टीपथात आल्याने जागतिक पातळीवर भांडवली बाजारात आज दिसलेला उत्साह भारतीय शेअर बाजारातही दिसून आला. शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १०७३.६१ अंकांच्या जबरदस्त उसळीसह ७६,४८८.९६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ३१२.४० अंकांनी वाढून २४,०३१.७० अंकांवर स्थिरावला.

मध्य पूर्वेतील संघर्ष निवळत चालल्याने कच्च्या तेलाच्या किंमतीही आज प्रतिपिंप शंभर डॉलरच्या खाली आला. सातत्याने नव नवे नीचांक नोंदवणाऱ्या रुपयालाही आज काहीसा आधार मिळाला. आज शेअर बाजाराने सुरुवातच अत्यंत जबरदस्त केली. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी बाजार सुमारे एक टक्क्याच्या वाढीसह तेजीत उघडला.

## कलाकार विजय पाटकरांना सामंतांच्या पत्नीसाठी धमक्या?



**चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत यंदा मंत्री उदय सामंत यांना आपली पत्नी नीलम शिर्के यांचे पूर्ण पॅनल निवडून आणत पत्नीला अध्यक्ष करायचे आहे. बाल रंगभूमी परिषदेचे अध्यक्ष पद नीलम शिर्के यांना दिल्यानंतर आता रंगभूमी क्षेत्रात उदय सामंत यांची घुसखोरी सुरू झाली आहे. विजय पाटकर यांनी पोस्ट करीत गंभीर आरोप केले की उदय सामंत यांचा विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) हा येथे ठाण मांडून बसला आहे. ओएसडीने मला उमेदवारी अर्ज भरू दिला नाही .**

■ नवी दिल्ली

**या** प्रकरणात आता उबाठा उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उडी घेत मंत्री उदय सामंत यांच्या पत्नीला निवडून आणण्यासाठी सरकारी यंत्रणेचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप केला आहे. अभिनेते विजय पाटकर पोस्ट करत म्हणाले की, मी उमेदवारी अर्ज भरून कोल्हापूरला पाठवला होता, मात्र काही लोकांनी राजकारण करून तो अर्ज प्रक्रियेतून पुढे जाऊ दिला नाही. एका मंत्र्यांचा ओएसडी गेल्या काही दिवसांपासून कोल्हापुरात पान ७ वर

## नीट सुनावणी! एनटीएवर ताशेरे मागील पेपरफुटीनंतर सुधारणा नाही

■ नवी दिल्ली

**नीट** पेपर लीक प्रकरणात सुप्रीम कोर्टाने एनटीए म्हणजे राष्ट्रीय परीक्षा एजन्सीवर कडक ताशेरे ओढले असून, एजन्सीने मागील घटनांमधून कोणताही धडा घेतला नाही, असे निरीक्षण नोंदवले आहे. या प्रकरणी केंद्र सरकार, एनटीए आणि सीबीआयकडून उत्तर मागविण्यात आले आहे. एनटीएला परीक्षा सुधारणा उपाययोजना कितपत लागू झाल्या आहेत, याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन या संस्थेने नीट पेपरफुटी प्रकरणी सुप्रीम कोर्टात याचिका केली आहे. नीट यूजीसारखी मोठी परीक्षा घेण्यासाठी सध्याच्या व्यवस्थेऐवजी अधिक सक्षम आणि स्वायत्त संस्था स्थापन करण्याची मागणी त्यांनी याचिकेत केली आहे. या प्रकरणी आज झालेल्या सुनावणीत न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांच्या खंडपीठाने एनटीएला निर्देश दिले की, २०२४ मध्ये सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशांनुसार आणि शिफारसींनुसार आतापर्यंत कोणती पावले उचलली गेली, याबाबत सविस्तर अहवाल गुरुवारपर्यंत सादर करावा.

केंद्र सरकारने माजी इस्त्रो प्रमुख के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीकडून न्यायालयाने अहवाल मागवला आहे. या समितीच्या शिफारशींवर आतापर्यंत काय प्रगती झाली, याबाबतही कोर्टाने माहिती मागितली आहे. सुप्रीम कोर्टाने या पान ७ वर

## कांद्याच्या दर घसरणीविरोधात मविआचा आज नाशिकमध्ये मोर्चा

■ नाशिक

**मागील** काही दिवसांपासून कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरल्यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. बाजारात मिळणारा दर उत्पादन खर्चापेक्षाही कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने उद्या 'कांदा उत्पादक शेतकरी क्रांती महामोर्चा'चे आयोजन केले आहे. हा महामोर्चा उद्या सकाळी ९ वाजता नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली (मुंबई-आग्रा महामार्ग) येथे काढण्यात येणार आहे.

कांद्याला योग्य हमीभाव मिळावा, यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, आमदार रोहित पवार, उबाठाचे आमदार अंबादास दानवे सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## पूर्व विदर्भात काँग्रेसला मोठे खिंडार साठहून अधिक नगरसेवक नॉट रिचेबल

■ नागपूर

**राज्यात** विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुका जाहीर होताच मतदार पळवा पळवीला ऊत आला आहे. पूर्व विदर्भातील काँग्रेसचे साठहून अधिक नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांचे मोबाईल फोन बंद झाले असून, ते नॉट रिचेबल झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या मतदारसंघातील सिंदेवाही नगर पंचायतीचे नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा यामध्ये



समावेश आहे. भाजपाने त्यांना पर्यटनासाठी पाठवल्याची चर्चा आहे.

विधान परिषदेची ही निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्थ्यांवर निवडून आलेल्या (जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक) लोकप्रतिनिधींमधून होणार असल्याने प्रत्येक जिल्हा परिषद सदस्य आणि नगरसेवकांच्या मताला मोठे मोल आहे. अशातच भाजपाने काँग्रेसला गाफील ठेवून मोठी रणनीती आखल्याची चर्चा आहे.

काँग्रेसचे गायब झालेले हे सर्व नगरसेवक भाजपाचे चिमूरचे आमदार बंडी भांगडिया यांच्या थेट संपर्कात असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात आहे. भाजपाने या सर्व नगरसेवकांना तातडीने राज्याबाहेर अज्ञात स्थळी हलवल्याची चर्चा आहे. केवळ सिंदेवाहीच नव्हे तर चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील नगरसेवकांचा पान ७ वर

## त्र्यंबकेश्वर येथे अडीच हजार भरून ८ मिनिटांत दर्शन



■ त्र्यंबकेश्वर

**भाविकांची** वाढती गर्दी आणि दर्शनासाठी होणारा विलंब तसेच तिकिटांचा काळाबाजार रोखण्यासाठी श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टकडून 'ब्रेक दर्शन' योजना सुरू करण्याची तयारी सुरू आहे. या योजनेंतर्गत अडीच हजार रुपये शुल्क भरून भाविकांना अवघ्या आठ मिनिटांत दर्शन मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत दररोज सुमारे ५०० भाविकांना प्राधान्याने दर्शनाची सुविधा देण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र काऊंटर आणि विशेष ओळख व्यवस्था उभारली जाणार आहे. सध्या मंदिरात मोफत धर्मदर्शन आणि २०० रुपयांचे देणगी दर्शन अशा स्वतंत्र रांगा आहेत. मात्र मुख्य मंदिराजवळ या रांगांचा संगम होत असल्याने मोठी गर्दी आणि प्रतीक्षेचा कालावधी वाढत असल्याचे दिसून येते. नव्या योजनेत 'ब्रेक' पद्धतीने काही काळासाठी सर्वसामान्य रांग थांबवून प्राधान्य दर्शन दिले जाणार असल्याचे समजते. देवस्थान ट्रस्टकडून ही योजना लवकरच सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, २०० रुपयांचे देणगी दर्शन पूर्ववत सुरू राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## आंबेनळी घाटात कार कोसळून ८ जणांचा मृत्यू

■ रायगड

**रायगड** जिल्ह्यातील आंबेनळी घाटात काल रात्री अपघात झाला. कोकणातील हर्णे बंदरावरून साताऱ्याकडे प्रवास करत असताना पर्यटकांची स्कॉर्पिओ गाडी १,५०० फूट खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत गाडीत प्रवास करणाऱ्या सर्व ८ जणांचा जागीच मृत्यू झाला.



मृतांमध्ये एक जण रत्नागिरी जिल्ह्यातील तर उर्वरित सात जण सातारा जिल्ह्यातील आहेत. महेश पवार (२५), आदित्य साळुंखे (२१), रितेश लोखंडे (२५), सुहास लोखंडे (२०), अंश चव्हाण (१८), उत्कर्ष शिंगटे (२१), अनिल शिंगटे (२५) आणि नितीन नायकोंडे (३५) हे सर्व मित्र वीकेंड निमित्त महाबळेश्वर परिसरात फिरण्यासाठी आले होते. परतीच्या प्रवासात अंधार आणि घाटातील तीव्र वळणांमुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. अपघाताची माहिती मिळताच रायगड पोलीस आणि स्थानिक बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. मात्र, दरीची खोली आणि रात्रीचा अंधार यामुळे बचावकार्य करताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. रात्री दोन वाजताच्या सुमारास दरीतून मृतदेह वर काढण्याचे काम सुरू झाले. मात्र, रात्रीच्या अंधारामुळे मृतदेह बाहेर काढण्यास विलंब होत होता. ट्रेकर्स आणि बचाव पथक दोरीला स्ट्रेचर बांधून दरीतून मृतदेह बाहेर काढत होते.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## इंधन संकटामुळे २७ देशांची मदतीसाठी वर्ल्ड बँकेला गळ

■ नवी दिल्ली

**मध्य पूर्वेत** सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक अर्थकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. कच्च्या तेलाच्या दरांमध्ये झालेल्या वाढीचा फटका अनेक देशांना बसत आहे. यामुळे परकीय चलनसाठ्यावर ताण येत असल्याने तब्बल २७ देशांनी जागतिक बँकेकडे आपत्कालीन आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

या २७ देशांपैकी तीन देशांनी तातडीच्या निधीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली आहे, तर उर्वरित २४ देशांचे प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहेत. मात्र या देशांची अधिकृत नावे जाहीर केलेली नाहीत. वर्ल्ड बँकेनेही यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे या यादीत भारताचाही समावेश आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे कच्च्या तेलाच्या पुरवठा साखळीत अडथळे निर्माण झाले आहेत.

पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. याचा परिणाम वाहतूक, उद्योग आणि शेती क्षेत्रावरही जाणवत आहे. खतांचा पुरवठा विस्कळीत झाल्याने कृषी उत्पादनांवरही दबाव निर्माण झाला आहे. एकूण १०१ देशांना या प्रकारच्या आपत्कालीन मदतीचा फायदा होऊ शकतो, ज्यापैकी ५४ देशांना त्यांच्या मंजूर पण न वापरलेल्या निधीपैकी १० टक्के रक्कम तातडीने वापरण्याची परवानगी मिळू शकते.

## अमेरिकेत ग्रीन कार्ड नियम अधिक कडक! स्थलांतरितांमध्ये चिंता वाढली

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने एक नवीन इमिग्रेशन (स्थलांतर) धोरण जाहीर केले आहे. या नव्या धोरणामुळे अमेरिकेत आधीच कायदेशीररित्या राहणाऱ्या अनेक स्थलांतरितांना देश सोडून मायदेशी परतण्यास आणि तेथूनच कायमस्वरूपी निवासासाठी (ग्रीन कार्ड) अर्ज करण्यास भाग पाडले जाऊ शकते.**

■ वॉशिंग्टन



**आंतरराष्ट्र** 'यूएस सिटीझनशिप अँड इमिग्रेशन सर्व्हिसेस'ने जारी केलेल्या धोरण पत्रकानुसार, 'अॅडजस्टमेंट ऑफ स्टेटस' ही प्रक्रिया आता प्रशासकीय सवलत आणि विशेष अधिकाराच्या स्वरूपात मानली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक अर्जाची स्वतंत्रपणे कठोर तपासणी केली जाईल आणि अर्जदार विशेष पात्रतेच्या निकषांमध्ये बसतो का, याचा निर्णय अधिकाऱ्यांच्या विवेकाधिकारावर अवलंबून असेल. नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार, अपवादात्मक परिस्थिती वगळता परदेशी नागरिकांनी ग्रीन कार्डसाठी अर्ज करण्यासाठी आपल्या देशात परत जाऊन दूतावास प्रक्रियेद्वारे अर्ज करणे अपेक्षित राहणार आहे. या निर्णयाचा उद्देश बेकायदेशीर वास्तव्यास आळा घालणे आणि इमिग्रेशन प्रणाली अधिक नियंत्रित करणे असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

या निर्णयावर स्थलांतरित हक्क संघटना, डेमोक्रॅटिक पक्षाचे खासदार आणि स्थानिक प्रशासनाकडून तीव्र टीका होत असून, यामुळे कुटुंबांचे विभाजन आणि स्थलांतरितांवरील दबाव वाढेल, असा आरोप केला जात आहे. या बदलाचा सर्वाधिक परिणाम विद्यार्थी, संशोधक, पर्यटक तसेच एच-१बी व्हिसाधारक कर्मचाऱ्यांवर होऊ शकतो.

## भोंदू खरातला आता ईडीकडून अटक मर्सिडीजसह कोटींची रोकड जप्त

■ नाशिक

**लैंगिक** शोषणाच्या आरोपामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेला स्वयंघोषित भोंदू महाराज अशोक खरातला आता ईडीने अटक केली. मनी लॉंड्रिंग आणि खंडणी प्रकरणाच्या तपासानंतर मुंबईतून कारवाई झाली. याप्रकरणी मर्सिडीजसह कोटींची रोकड जप्त करण्यात आली.

१३ आणि १४ एप्रिल, १७ एप्रिल, २३ एप्रिल, ५ मे आणि १८ मे रोजी ईडीने खरात आणि त्याच्या निकटवर्तीयांच्या ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत तब्बल १३.९२ कोटी रुपयांची रोकड आणि ५,५०० अमेरिकन डॉलर्स जप्त करण्यात आले. तसेच सुमारे १.१२ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिनेही जप्त करण्यात आले आहेत.

याशिवाय विविध बँक खात्यांतील २.२५ कोटी रुपयांची रक्कम गोठवली आहे. गुन्ह्यातील पैशातून खरेदी केल्याचा संशय असलेली एक आलिशान मर्सिडीज-बेन्झ कारही ईडीने जप्त केली. तपासादरम्यान अनेक बेनामी मालमत्तांची कागदपत्रे आणि डिजिटल उपकरणेही ईडीच्या हाती लागली आहेत.

## दिल्ली मद्य धोरण घोटाळा खटला केजरीवाल सहकार्य करण्यास तयार

■ नवी दिल्ली

**दिल्ली** कथित मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणी न्यायाधीश स्वर्ण कांता शर्मा खटल्याच्या सुनावणीपासून स्वतः हून दूर झाल्यानंतर माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी खटलात सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

या खटल्यात कनिष्ठ न्यायालयाने २७ फेब्रुवारी रोजी दिलेल्या आदेशात केजरवाल, उप मुख्यमंत्री मनिष सिसोदिया आणि अन्य २१ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. कनिष्ठ न्यायालयाच्या या निर्णयाला सीबीआयने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. सीबीआयच्या या याचिकेवर न्या.स्वर्ण कांता शर्मा यांच्या न्यायासनासमोर सुनावणी होणार होती. मात्र न्या.शर्मा यांच्यावर पक्षपातीपणाचा आरोप करत केजरीवाल आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी सुनावणीवर बहिष्कार टाकला. स्वर्ण कांत शर्मा यांना बदलून त्यांच्याऐवजी दुसऱ्या निः पक्षपाती न्यायाधीशाची नेमणूक करा, अशी मागणी केजरीवाल यांनी केली. त्यामुळे तिढा निर्माण झाला होता.मात्र न्या.शर्मा या स्वतःच या खटल्यातून दूर झाल्यामुळे तिढा सुटला आहे. आता न्या. मनोज जैन हे या खटल्याची सुनावणी करणार आहेत.

# छोट्या जाहिराती
संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

दादर येथे फ्रेश बी.कॉम. अकाऊंट असिस्टंट पाहिजेत. टॅली, वर्ड, एक्सेल आवश्यक. तसेच १०वी/ १२वी पास/ नापास ऑफीस बॉय पाहिजेत. वेस्टर्न लाइनवर राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्कः **02224228330/ 8104955630** {NC260650}

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/ महिला पाहिजेत. **9987577655** {NC260667}

10/12 तास होम पेशंट ड्यूटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला पर डे. **9372767739 / 8452061740** {NC260614}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटर :**9819426634/ 9969529162** {NC260638}

सकाळी 9-2 सिनिअर सिटीझनसाठी घरकाम करणारी 35-50 वयाची बाई पाहिजे पगार 12000+ 500 प्रवासभत्ता संपर्क **9820149975** {NC260672}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

राममंदिर पूर्व, मुंबई येथे कोमोरी ऑटोप्लेट मशिन २०x२८ साठी प्रिंटर,बॉयलर व बाईंडर पाहिजेत. संपर्क : **9320882148** {NC260586}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे. सायन, वडाळा, चेंबूर. संपर्क- **7303772600** {NC260678}

ऑफीस बाहेर कामासाठी मुले पाहिजे. पगार 12000/- + प्रवास भत्ता. प्रत्यक्ष भेटा.. ग्लोबल सोल्युशन, ४०२ साई आर्केड, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई- 400080 {NC260674}

## पाहिजेत

CCTV आणि SOLAR इंस्टॉलर पाहिजे. पगार २५०००/- पासून + प्रवास भत्ता. प्रत्यक्ष भेटा. ग्लोबल सोल्यूशन, ४०२ साई आर्केड, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई- 400080 {NC260675}

सिक्युरिटी हाऊसकिपिंग कंपनीला-सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर, हाऊसकिपिंग मुले / मुली पाहिजेत- **9223380569/ 68** {NC260492}

Logistic & cargo कंपनीमध्ये salesman पाहिजेत Experience person प्राधान्य Blueair Logistic division of Blueair cargo & courier Pvt. Ltd. PM. Road Fort Mumbai 400001. Call & whatsapp Resume before interview - **9833343566** {NC260657}

दहावी पास/नापास ५ मुले पाहिजेत बाहेरील कामासाठी विरार ते भाईंदर परिसरातील राहणारे **9833911797** {NC260635}

जोगेश्वरी जय कोच जवळ प्रिंटिंग प्रेससाठी ऑफीस बॉय पाहिजे. **9320255500** {NC260679}

ग्रँटरोड (केम्सकॉर्नर) हाऊसकीपिंग कामाकरिता त्वरित मुले/ मुली पाहिजेत. संपर्क- **9819292051** {NC260681}

लेथ मशीन टर्नर, ड्रिलिंग टॅपिंग व हँडप्रेस पॉवरप्रेस मेटलशीट व मेटल बफिंग, बेंडिंग व प्लास्टिक इंजेकशन मोल्डिंग मशीनचे हुशार कारागीर, हेल्पर मुले/मुली व एम्ब्रोडरी मशीन ऑपरेटर पाहिजेत. २४० शांती इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, तांबे नगर, एसएन रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई - 400080. दिलीप पांचाळ **9221232176** {NC260684}

## पाहिजेत

अर्धवेळ काम पोलीस/सैन्य दलातून निवृत्त झालेल्यांसाठी १२वी पास: **9870231322** {NC260682}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोडयेथे सफाई कर्मचारी बाई/पुरुष पाहिजेत. **8169862708/ 9004949778** {NC260683}

## Situation Vacant

GRADUATE OR 12th PASS LADY CANDIDATE STAYING NEAR AMBAD "NASHIK" CAN APPLY FOR CLERICAL JOB. CONTACT: **9819853443** {NC260637}

Wanted courier boys for international Couriers at Khar. call **9930011100** {NC260686}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260552}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260680}



### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# वाई येथील प्राज्ञपाठशाळचे संस्थापक केवलानंद सरस्वती उदयशंकर

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरु, वाई येथील प्राज्ञपाठशाळचे संस्थापक केवलानंद सरस्वती उदयशंकर यांचा जन्म ८ डिसेंबर १८७७ रायगड जिल्ह्यातील सुडकोली गावी झाला. नारायण सदाशिव मराठे उर्फ केवलानंद सरस्वती उदयशंकर हे महाराष्ट्रातील धर्मसुधारणावादी श्रेष्ठ संस्कृत पंडित होते.**



**ऋग्वेद,** संस्कृत काव्यवाङ्मयय आणि व्याकरण, न्याय, वेदान्त, मीमांसा इत्यादींत पारंगत. शिक्षण प्राचीन पद्धतीने गुरुगृही झाले. नव्य-न्यायाचे व शांकर अद्वैत वेदान्ताचे अध्ययन, १८९५ मध्ये वाई येथे आल्यावर झाले. अध्यात्मविद्येचे अध्ययन प्रज्ञानंदसरस्वती यांच्यापाशी झाले. वाई येथे स्वतःची पाठशाळा १९०१ पासून सुरू केली. त्याच पाठशाळेचे 'प्राज्ञपाठशाळा' असे नामकरण १९१६ साली केले.

दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इ. त्यांचे नामवंत शिष्य होते. १९२० साली प्राज्ञपाठशाळेस राष्ट्रीय शिक्षणसंस्थेचे स्वरूप दिले. त्यातून अनेक स्वातंत्र्य सैनिक तयार झाले. यशवंतराव चव्हाण यांचाही त्यांचेशी संपर्क होता. कृष्णा घाटावर त्यांचे वास्तव्य होते. १९२५ साली धर्मकोशाच्या कार्यास प्रारंभ केला. संस्कृतमध्ये मीमांसाकोश (७ खंड, १९५२ - ६६) संपादन केला. हिंदुधर्मसुधारणेची चळवळ चालू ठेवण्याकरिता १९३४ साली म. म. डॉ. पां. वा. काणे, रघुनाथ शास्त्री कोकजे, केशव लक्ष्मण दप्तरी, ना. गो. चापेकर, ज.र. घारपुरे, म. म. श्रीधरशास्त्री पाठक इ. विद्वानांच्या साहाय्याने, धर्मनिर्णयमंडळ स्थापिले.




**संजीव वेलणकर, पुणे**

ब्रह्मचर्यातूनच १९३१ साली त्यांनी संन्यास घेतला. संन्यास घेतल्यावर बद्रीनाथची पायी यात्रा केली.

करारी स्वभाव, उज्ज्वल चारित्र्य, अध्यात्मनिष्ठा व त्यागी जीवन हे त्यांचे व्यक्तिमत्त्वविशेष होत. वाई येथे ते निधन पावले. त्यांचे तेथे स्मारकमंदिर उभारले असून तेथे धर्मकोशाचे संपादनकार्य चालते. १९७५ पर्यंत त्याचे अकरा भाग प्रकाशित झाले. मीमांसाकोश व धर्मकोश ह्या ग्रंथांना आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभली. केवलानंद सरस्वती उदयशंकर यांचे १ मार्च १९५५ रोजी निधन झाले.

# संकेतस्थळावर लग्न जुळलेल्या तरुणाचा पहिल्या भेटीनंतर अपघातात मृत्यू

■ नालासोपारा

**संकेतस्थळावर** लग्न जुळलेल्या एका जोडप्याची पहिलीच भेट शोकांतिका ठरली. जोगेश्वरी येथे एका बसने जोडप्याच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात तरुणाचा मृत्यू झाला तर तरुणी गंभीर जखमी झाली

नालासोपारामध्ये राहणाऱ्या काजल मादेशिया (२६) या तरूणीची एका ऑनलाइन विवाह संकेतस्थळावरून अंधेरीतील दीपेन जैन (३२) याच्याशी ओळख झाली होती. काल दुपारी ते दोघे अंधेरी स्थानकाजवळ भेटले. दीपेनकडे दुचाकीवरून तिला जुहू येथील हरे राम हरे कृष्ण मंदिरात गेला. नंतर ते आरे कॉलनी येथील हनुमान मंदिरात गेले. संध्याकाळी साडेसातच्या सुमारास ते अंधेरीकडे परत येत असताना रात्री साडेसातच्या सुमारास जोगेश्वरी पूर्वेकडील पश्चिम द्रुतगती मार्गावरील जेव्हीएलआर जंक्शनजवळ त्यांच्या स्कूटरला मागून भरधाव प्रवासी बसने जोरदार धडक दिली. या अपघातात दिपेन आणि काजल गंभीर झखमी झाले. दीपेनने हेल्मेट घातले होते. तरीही त्याच्या डोक्याला, चेहऱ्याला, कानाजवळ आणि हातांना गंभीर दुखापत झाली. जोगेश्वरीच्या ट्रॉमा केअर रुग्णालयात उपचारादरम्यान रात्री दिपेनचा मृत्यू झाला. काजलच्या दोन्ही गुडघ्यांना दुखापत झाली आहे. पोलिसांनी खासगी बसचलाक प्रसाद जाधव (२७) याला अटक केली आहे.

# अभिनेते धर्मेंद्र यांना पद्म पुरस्कार हेमा मालिनी यांनी स्वीकारला

■ नवी दिल्ली

**नवी** दिल्लीतील राष्ट्रपती भवन येथे पार पडलेल्या पद्म पुरस्कार २०२६ सोहळ्यात कला, साहित्य, संगीत आणि चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांचा गौरव करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर विविध क्षेत्रांतील मान्यवरांनाही पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार त्यांच्या वतीने पत्नी अभिनेत्री हेमा मालिनी यांनी पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार स्वीकारताना त्या भावूक झाल्या होत्या. त्यांची मुलगी अहाना देओल हिच्याही डोळ्यांत अश्रू तरळले होते. प्रसिद्ध व्हायोलिनवादक डॉ. एन. राजम यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. जाहिरात क्षेत्रातील दिग्गज पियुष पांडे यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी नीता जोशी यांनी हा सन्मान स्वीकारला. याशिवाय कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अनेक कलाकारांना पद्मश्री पुरस्कार देण्यात आले. यामध्ये प्रोसेनजीत चटर्जी, गफ्फारुद्दीन मेवाती जोगी, मीर हाजी कासम आणि रघुवीर खेडकर यांचाही समावेश होता.

# गडचिरोलीत उष्म्यामुळे ५०० वटवाघळांचा मृत्यू

■ गडचिरोली

**महाराष्ट्रातील** विदर्भात उकाडा चांगलाच वाढला आहे. ४६ डिग्रीपर्यंतच्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या उन्हाचा फटका केवळ मनुष्यांनाच बसत आहे असे नाही. तर गडचिरोलीमध्ये उष्णतेमुळे एकाच झाडावरील ५०० वटवाघळांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा वनविभागातील परिसरात चिंचेच्या झाडावर वटवाघळांचे वास्तव्य असते. गेल्या २०-२२ वर्षांपासून या झाडावर वटवाघळांचा मुक्काम आहे. मात्र यंदा अतीउष्णता सहन न झाल्याने या झाडावरील एकाच वेळी ५०० पेक्षा अधिक वटवाघळांचा मृत्यू झाला. अचानक जंगलातून दुर्गंधी येऊ लागल्यानंतर लोकांनी तिथे जाऊन पाहिल्यावर हा प्रकार उघडकीस आला. झाडाच्या खाली वटवाघळे मृतावस्थेत पडलेली आढळली.

# वसईत महिला ग्रामविकास अधिकाऱ्याला लाच घेताना अटक

■ वसई

**ग्रामविकास** अधिकारी महिलेला ४५ हजारांची लाच घेताना सोमवारी रंगेहाथ अटक करण्यात आली. अनधिकृत बांधकामाचा पंचनामा न करण्यासाठी ही लाच मागितली होती.

तक्रारदार आणि त्यांच्या मामाची नालासोपारा पूर्वेच्या बिलालपाडा येथे जमीन आहे. या जमिनीवर वाद सुरू आहे. दरम्यान त्यांनी या जागेवर ४ अनधिकृत खोल्या बांधल्या होत्या. या जागेचा पंचनामा न करण्यासाठी तसेच माती भरावाप्रकरणी कारवाई न करण्यासाठी पेल्हार येथील ग्राम विकास अधिकारी उज्वला पाटील यांनी १ लाख ९५ हजारांची लाच मागितली होती. या प्रकरणी तक्रारदाराने पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. सोमवारी लाचेच्या रकमेतील ४५ हजारांचा पहिला हफ्ता घेताना ग्राम विकास अधिकारी उज्वला पाटील यांनी कार्यालयात सापळा लावून रंगेहाथ अटक करण्यात आली.

# नालेसफाई न झाल्याने पुणे पालिकेवर शिंदे गटाचे आंदोलन

■ पुणे

**भाजपाची** सत्ता असलेल्या पुणे पालिकेच्या कारभारावर रोष व्यक्त करत शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांनी आज धडक आंदोलन केले. पावसाळ्यापूर्वी शहरातील नालेसफाईची कामे पूर्ण न झाल्याच्या मुद्द्यावरून शिंदेसेनेच्या गटाने पुणे महापालिकेविरोधात आक्रमक भूमिका घेतली. नालेसफाईच्या कामांमध्ये झालेल्या कथित दिरंगाई आणि निष्काळजीपणा विरोधात शिवसेना कार्यकर्त्यांनी आंदोलन करत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पावसाळ्यात नागरिकांना संभाव्य पूरस्थिती आणि गैरसोयींचा सामना करावा लागू नये, अशी मागणी शिवसेनेने केली.

# आग्र्यात झिपलाइनचा दोर तुटून १६ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ आग्रा

**आग्रा** चौपाटी येथे झिपलाइनचा दोर तुटल्याने १६ वर्षीय मुलाचा ४५ फूट खाली पडून मृत्यू झाला. ही दुर्घटना त्याच्या कुटुंबीयांसमोरच घडली. झिपलाइन हा एक साहसी खेळ आणि पर्यटनाचा लोकप्रिय प्रकार आहे. यात दोन टोकांच्या दरम्यान एका मजबूत स्टेनलेस स्टीलच्या तारेवर अडकवून, एका उंच ठिकाणाहून दुसऱ्या सखल ठिकाणी हवेतून घसरत जाण्याची सोय असते

मृत मुलाचे नाव कुणाल अग्रवाल असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणाल झिपलाइन राइडसाठी प्लॅटफॉर्मवर गेला होता. त्यावेळी त्याचे आई-वडील आणि लहान भाऊ काही अंतरावर उभे राहून त्याला पाहत होते. झिपलाइन सुरू झाल्यानंतर काही क्षणांतच दोर तुटला आणि कुणाल सुमारे ४५ फूट खाली पडला. या घटनेत त्याचा जागीच मृत्यू झाला.या दुर्घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. २६ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | प्रयत्न थोडे वाढवल्यास यश मिळेल. आर्थिक लाभ होईल. कामाच्या अनेक नवीन संधी येतील. |
| वृषभ | तणावाचा दिवस. अडथळे येतील. जोडीदाराशी कठोर वागणे टाळा. प्रवास त्रासदायक होईल. |
| मिथुन | सावधपणे व्यवहार करा. नकारार्थी विचारांना थारा देऊ नका. कामाचे श्रेय न मिळण्याची शक्यता. |
| कर्क | योग्य दिशेने प्रयत्न यश देतील. उत्पादकता वाढेल. कामाचे समाधान लाभेल. |
| सिंह | कठीण प्रसंग संयमाने हाताळावे लागतील. कामाची दगदग वाढेल. तब्येत सांभाळा. |
| कन्या | दगदगीचा दिवस आहे. पैशाचा ताळमेळ घालावा लागेल. सहकाऱ्यांबरोबर गैरसमजाची शक्यता. |
| तूळ | प्रगतीच्या मार्गात अडथळे येतील. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. प्रवासात खिसापाकीट सांभाळा. |
| वृश्चिक | यशाची दारे खुली होतील. कामात व्यस्त राहाल. महत्त्वाचे निर्णय घेण्यास दिवस उत्तम आहे. |
| धनु | इच्छापूर्तीसाठी अनुकूलता राहील. आधी घेतलेले महत्त्वाचे निर्णय फलदायी ठरतील.आर्थिक समाधान लाभेल. |
| मकर | दिवस फारसा अनुकूल नाही. अनावश्यक मानसिक उलघाल होत राहील. कामे सुरळीत होण्यासाठी सहकाऱ्यांचा सल्ला घ्या. |
| कुंभ | चिंताग्रस्त राहाल. रोजच्या कामांवर याचा विपरीत परिणाम संभवतो. आर्थिक स्थिती निराशाजनक असेल. |
| मीन | कामात व्यग्र राहाल. नवीन गोष्टींचा ध्यास तीव्र होईल. यशासाठी कठोर मेहनत घ्यावी लागेल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी · तिकीट किंमत रु. 50/- · सोडत क्र. 21 · सोडत दिनांक 25/05/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | SL-05 : 1495 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 1495 | महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7102 | श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2121 | 3958 | 4004 | 4949 | 5618 | 5735 | 5822 | 7764 | 8624 | 9152 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1052 | 1624 | 1732 | 1786 | 2867 | 4182 | 6906 | 7111 | 8490 | 9942 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0517 | 1544 | 4380 | 6864 | 7287 | 7343 | 8135 | 8175 | 8881 | 9999 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0377 | 1395 | 1957 | 2508 | 4435 | 4728 | 5188 | 5812 | 6165 | 9215 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1339 | 2087 | 2725 | 3398 | 4230 | 5005 | 5551 | 6286 | 7002 | 7783 | 8578 | 9309 |
| | | 1346 | 2091 | 2727 | 3411 | 4248 | 5053 | 5560 | 6299 | 7015 | 7784 | 8589 | 9315 |
| | | 1373 | 2114 | 2728 | 3431 | 4266 | 5059 | 5570 | 6315 | 7025 | 7793 | 8634 | 9390 |
| | | 1384 | 2121 | 2742 | 3438 | 4274 | 5082 | 5578 | 6326 | 7059 | 7794 | 8638 | 9396 |
| | | 1387 | 2162 | 2767 | 3439 | 4340 | 5122 | 5579 | 6436 | 7097 | 7812 | 8662 | 9399 |
| 0015 | 0668 | 1410 | 2172 | 2784 | 3493 | 4419 | 5123 | 5595 | 6441 | 7122 | 7926 | 8735 | 9425 |
| 0021 | 0693 | 1415 | 2183 | 2829 | 3506 | 4430 | 5124 | 5597 | 6446 | 7132 | 7957 | 8768 | 9446 |
| 0022 | 0697 | 1425 | 2186 | 2858 | 3532 | 4434 | 5142 | 5599 | 6466 | 7157 | 7962 | 8769 | 9454 |
| 0032 | 0700 | 1437 | 2188 | 2874 | 3564 | 4443 | 5150 | 5605 | 6566 | 7173 | 7970 | 8782 | 9460 |
| 0051 | 0707 | 1438 | 2215 | 2903 | 3606 | 4451 | 5160 | 5624 | 6586 | 7195 | 7979 | 8789 | 9469 |
| 0056 | 0708 | 1471 | 2231 | 2927 | 3623 | 4464 | 5178 | 5657 | 6592 | 7198 | 7980 | 8811 | 9491 |
| 0083 | 0710 | 1477 | 2252 | 2933 | 3625 | 4466 | 5238 | 5668 | 6619 | 7258 | 8002 | 8816 | 9492 |
| 0091 | 0715 | 1538 | 2255 | 2960 | 3631 | 4468 | 5245 | 5675 | 6638 | 7267 | 8018 | 8847 | 9521 |
| 0108 | 0733 | 1609 | 2257 | 2968 | 3633 | 4484 | 5255 | 5676 | 6659 | 7287 | 8087 | 8862 | 9554 |
| 0185 | 0740 | 1631 | 2271 | 3011 | 3634 | 4487 | 5256 | 5710 | 6660 | 7294 | 8100 | 8866 | 9568 |
| 0202 | 0767 | 1633 | 2272 | 3021 | 3640 | 4497 | 5273 | 5715 | 6666 | 7317 | 8102 | 8869 | 9585 |
| 0246 | 0775 | 1649 | 2291 | 3022 | 3651 | 4545 | 5275 | 5757 | 6668 | 7360 | 8108 | 8876 | 9594 |
| 0258 | 0805 | 1657 | 2292 | 3032 | 3657 | 4555 | 5296 | 5761 | 6676 | 7369 | 8140 | 8878 | 9629 |
| 0271 | 0815 | 1664 | 2297 | 3043 | 3692 | 4563 | 5302 | 5785 | 6687 | 7378 | 8150 | 8881 | 9634 |
| 0276 | 0850 | 1673 | 2301 | 3053 | 3693 | 4600 | 5337 | 5809 | 6719 | 7380 | 8216 | 8908 | 9648 |
| 0278 | 0872 | 1675 | 2322 | 3136 | 3710 | 4624 | 5345 | 5813 | 6746 | 7416 | 8233 | 8910 | 9691 |
| 0302 | 0908 | 1726 | 2325 | 3148 | 3729 | 4680 | 5396 | 5822 | 6752 | 7417 | 8248 | 8956 | 9692 |
| 0319 | 0924 | 1761 | 2366 | 3173 | 3730 | 4696 | 5403 | 5858 | 6754 | 7475 | 8263 | 8986 | 9819 |
| 0346 | 0934 | 1767 | 2382 | 3247 | 3735 | 4733 | 5407 | 5860 | 6756 | 7477 | 8276 | 8997 | 9880 |
| 0353 | 0985 | 1778 | 2398 | 3280 | 3738 | 4749 | 5411 | 5914 | 6758 | 7481 | 8285 | 9011 | 9903 |
| 0377 | 0998 | 1804 | 2400 | 3283 | 3770 | 4750 | 5412 | 5931 | 6761 | 7520 | 8287 | 9047 | 9909 |
| 0383 | 1021 | 1812 | 2407 | 3300 | 3804 | 4764 | 5431 | 6035 | 6798 | 7541 | 8290 | 9089 | 9911 |
| 0390 | 1041 | 1813 | 2423 | 3302 | 3809 | 4766 | 5435 | 6036 | 6811 | 7568 | 8328 | 9095 | 9912 |
| 0414 | 1061 | 1842 | 2447 | 3304 | 3883 | 4770 | 5457 | 6037 | 6824 | 7647 | 8333 | 9096 | 9920 |
| 0420 | 1071 | 1862 | 2455 | 3320 | 3935 | 4820 | 5482 | 6042 | 6852 | 7700 | 8361 | 9098 | 9930 |
| 0441 | 1100 | 1871 | 2470 | 3329 | 3937 | 4887 | 5484 | 6066 | 6881 | 7710 | 8384 | 9099 | 9934 |
| 0451 | 1109 | 1878 | 2520 | 3335 | 3971 | 4892 | 5500 | 6081 | 6886 | 7723 | 8399 | 9101 | 9938 |
| 0515 | 1129 | 1905 | 2532 | 3341 | 4004 | 4905 | 5505 | 6092 | 6897 | 7744 | 8418 | 9138 | 9942 |
| 0516 | 1141 | 1917 | 2539 | 3343 | 4018 | 4917 | 5506 | 6130 | 6925 | 7745 | 8446 | 9142 | 9949 |
| 0551 | 1157 | 1923 | 2560 | 3351 | 4084 | 4927 | 5511 | 6137 | 6931 | 7749 | 8468 | 9169 | 9957 |
| 0559 | 1210 | 1993 | 2563 | 3354 | 4119 | 4935 | 5521 | 6140 | 6937 | 7754 | 8480 | 9192 | 9959 |
| 0590 | 1231 | 1998 | 2573 | 3357 | 4145 | 4943 | 5525 | 6150 | 6939 | 7767 | 8481 | 9237 | 9962 |
| 0637 | 1265 | 2011 | 2632 | 3364 | 4147 | 4946 | 5532 | 6212 | 6954 | 7772 | 8498 | 9241 | 9969 |
| 0641 | 1276 | 2023 | 2642 | 3373 | 4185 | 4958 | 5545 | 6225 | 6976 | 7773 | 8516 | 9269 | 9979 |
| 0665 | 1317 | 2044 | 2649 | 3387 | 4221 | 5003 | 5550 | 6276 | 6990 | 7778 | 8522 | 9279 | 9989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. २६/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| २ | १ | ६ |
| २१ | १२ | ६२ |
| २६ | १७ | ६७ |
| १३८ | १२८ | १२३ |
| २३७ | ३८० | ३६७ |

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 25/05/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-04 : 2899 | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2326 | श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2461 | महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0689 | 0707 | 1006 | 2635 | 4582 | 4945 | 5335 | 7513 | 7646 | 8839 |
| 500/- | 1819 | 2453 | 2582 | 3398 | 3429 | 4498 | 4581 | 5948 | 8411 | 8485 |
| 200/- | 0066 | 0302 | 0511 | 2164 | 2213 | 2393 | 2929 | 8706 | 9261 | 9841 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1978 | 2686 | 3401 | 4314 | 5337 | 6158 | 7057 | 7720 | 8830 |
| | | 2110 | 2713 | 3420 | 4371 | 5340 | 6180 | 7074 | 7790 | 8845 |
| | | 2150 | 2802 | 3428 | 4400 | 5352 | 6227 | 7076 | 8007 | 8849 |
| 0005 | 1111 | 2160 | 2817 | 3515 | 4707 | 5428 | 6288 | 7127 | 8071 | 8908 |
| 0036 | 1121 | 2166 | 2859 | 3565 | 4852 | 5445 | 6332 | 7158 | 8149 | 9009 |
| 0045 | 1122 | 2189 | 2925 | 3629 | 4854 | 5486 | 6446 | 7237 | 8174 | 9125 |
| 0058 | 1151 | 2221 | 2949 | 3636 | 4920 | 5513 | 6456 | 7298 | 8185 | 9177 |
| 0076 | 1165 | 2224 | 2968 | 3736 | 4937 | 5515 | 6461 | 7340 | 8225 | 9207 |
| 0084 | 1181 | 2234 | 2993 | 3754 | 4942 | 5559 | 6464 | 7348 | 8258 | 9292 |
| 0120 | 1303 | 2246 | 3033 | 3837 | 4990 | 5589 | 6528 | 7401 | 8349 | 9329 |
| 0146 | 1375 | 2257 | 3080 | 3880 | 5008 | 5623 | 6536 | 7402 | 8365 | 9556 |
| 0281 | 1445 | 2297 | 3229 | 3926 | 5011 | 5701 | 6561 | 7478 | 8478 | 9596 |
| 0419 | 1543 | 2320 | 3273 | 3940 | 5030 | 5765 | 6612 | 7485 | 8481 | 9639 |
| 0484 | 1712 | 2325 | 3332 | 4000 | 5058 | 5893 | 6625 | 7490 | 8526 | 9824 |
| 0520 | 1721 | 2386 | 3343 | 4074 | 5069 | 5952 | 6688 | 7537 | 8551 | 9890 |
| 0562 | 1763 | 2513 | 3352 | 4091 | 5072 | 5954 | 6737 | 7577 | 8555 | 9897 |
| 0580 | 1766 | 2520 | 3360 | 4094 | 5088 | 5956 | 6760 | 7622 | 8578 | 9899 |
| 0840 | 1843 | 2552 | 3367 | 4184 | 5115 | 6036 | 6765 | 7697 | 8579 | 9934 |
| 0903 | 1915 | 2586 | 3369 | 4185 | 5203 | 6057 | 6779 | 7704 | 8698 | 9955 |
| 0927 | 1938 | 2628 | 3399 | 4238 | 5215 | 6115 | 6925 | 7708 | 8762 | 9966 |
| 1031 | 1962 | 2653 | 3400 | 4286 | 5309 | 6155 | 6962 | 7717 | 8820 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • धनलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 25/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — SL-01 : 5433

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1359 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 2494 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 3133 | 4142 | 4287 | 4443 | 4491 | 4598 | 8489 | 9595 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1579 | 1617 | 1701 | 2091 | 3947 | 4031 | 5137 | 5435 | 6312 | 8799 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1021 | 1364 | 1802 | 2114 | 6093 | 6330 | 8313 | 8670 | 9327 | 9720 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0803 | 1681 | 3092 | 4096 | 5438 | 6465 | 8764 | 9584 |
| | 0992 | 1814 | 3128 | 4240 | 5552 | 6492 | 8815 | 9613 |
| 0000 | 1091 | 1878 | 3143 | 4438 | 5664 | 6698 | 8878 | 9678 |
| 0004 | 1137 | 1993 | 3173 | 4459 | 5695 | 7133 | 9007 | 9679 |
| 0081 | 1187 | 2105 | 3283 | 4482 | 5711 | 7168 | 9058 | 9691 |
| 0086 | 1196 | 2240 | 3304 | 4561 | 5715 | 7585 | 9071 | 9692 |
| 0127 | 1350 | 2250 | 3332 | 4690 | 5716 | 7788 | 9143 | 9724 |
| 0242 | 1365 | 2274 | 3343 | 4860 | 5915 | 7875 | 9280 | 9798 |
| 0354 | 1412 | 2282 | 3347 | 4972 | 6021 | 8312 | 9332 | 9829 |
| 0516 | 1418 | 2361 | 3358 | 5365 | 6046 | 8408 | 9385 | 9890 |
| 0601 | 1420 | 2842 | 3371 | 5368 | 6265 | 8538 | 9488 | 9895 |
| 0607 | 1424 | 2956 | 3383 | 5394 | 6284 | 8678 | 9553 | 9980 |
| 0770 | 1450 | 2958 | 4004 | 5415 | 6459 | 8685 | 9554 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 25/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — GL-02 : 6140 — महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0230 | 0983 | 1010 | 1656 | 2488 | 5992 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | 6604 | 7738 | 8016 | 9637 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0058 | 0089 | 1013 | 2543 | 4138 | 4735 | 6047 | 6835 | 8336 | 9500 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0762 | 1557 | 1720 | 3721 | 4091 | 5790 | 7086 | 7363 | 8147 | 9819 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1415 | 1470 | 1587 | 1789 | 4194 | 4314 | 4373 | 6509 | 6737 | 7359 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1848 | 2583 | 3037 | 3832 | 4604 | 5450 | 6360 | 7170 | 7979 | 8823 |
| | | 1875 | 2611 | 3038 | 3839 | 4622 | 5501 | 6367 | 7213 | 8096 | 8875 |
| 0042 | 1014 | 1916 | 2624 | 3153 | 3880 | 4634 | 5503 | 6442 | 7234 | 8186 | 8882 |
| 0052 | 1039 | 2015 | 2630 | 3194 | 3940 | 4665 | 5521 | 6456 | 7280 | 8196 | 8887 |
| 0063 | 1063 | 2032 | 2632 | 3221 | 3967 | 4701 | 5535 | 6466 | 7321 | 8198 | 8982 |
| 0150 | 1065 | 2092 | 2662 | 3235 | 3972 | 4863 | 5557 | 6524 | 7381 | 8227 | 8983 |
| 0200 | 1080 | 2102 | 2712 | 3237 | 4004 | 4874 | 5560 | 6546 | 7446 | 8248 | 9135 |
| 0216 | 1091 | 2132 | 2722 | 3318 | 4041 | 4914 | 5563 | 6606 | 7451 | 8260 | 9225 |
| 0290 | 1113 | 2162 | 2752 | 3353 | 4048 | 4924 | 5593 | 6626 | 7474 | 8375 | 9281 |
| 0311 | 1115 | 2221 | 2799 | 3382 | 4058 | 4944 | 5600 | 6629 | 7481 | 8460 | 9382 |
| 0321 | 1121 | 2222 | 2801 | 3384 | 4265 | 4996 | 5694 | 6636 | 7485 | 8463 | 9389 |
| 0341 | 1122 | 2224 | 2820 | 3391 | 4348 | 5006 | 5715 | 6669 | 7533 | 8493 | 9441 |
| 0354 | 1235 | 2225 | 2824 | 3393 | 4374 | 5015 | 5938 | 6695 | 7666 | 8522 | 9492 |
| 0361 | 1261 | 2228 | 2831 | 3401 | 4434 | 5017 | 5953 | 6766 | 7678 | 8533 | 9584 |
| 0469 | 1309 | 2236 | 2874 | 3473 | 4442 | 5134 | 5954 | 6829 | 7694 | 8549 | 9592 |
| 0626 | 1516 | 2239 | 2887 | 3516 | 4453 | 5148 | 5955 | 6866 | 7709 | 8597 | 9640 |
| 0706 | 1521 | 2252 | 2888 | 3577 | 4468 | 5194 | 5965 | 6903 | 7760 | 8601 | 9860 |
| 0725 | 1541 | 2259 | 2893 | 3591 | 4497 | 5253 | 6088 | 7014 | 7782 | 8665 | 9898 |
| 0812 | 1542 | 2302 | 2902 | 3642 | 4499 | 5321 | 6121 | 7068 | 7845 | 8677 | 9917 |
| 0938 | 1579 | 2433 | 2922 | 3710 | 4516 | 5345 | 6130 | 7079 | 7917 | 8783 | 9938 |
| 0977 | 1684 | 2462 | 2982 | 3784 | 4544 | 5354 | 6188 | 7095 | 7937 | 8789 | 9947 |
| 0987 | 1831 | 2532 | 3030 | 3818 | 4574 | 5410 | 6242 | 7143 | 7977 | 8793 | 9964 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# विपश्यना एक अनुभव


प्रशांत साजणीकर

**अ**नेक वर्षे माझ्या उजव्या हातात एक धागा बांधत होतो. तो बांध असं कोणी मला सांगितलं नव्हतं आणि तो धागा बांधल्यामुळे मी कुठली पथ्यं पाळत होतो असंही नाही. पण मनात एक श्रद्धा होती आणि आताशा मला त्या धाग्याची सवय झाली होती. बोटातल्या अंगठीचं पण तेच. आईने सांगितलं म्हणून मी ती वापरायला सुरुवात केली आणि वापरत राहिलो. आता तो धागा काढणं सहज शक्य नव्हतं म्हणून त्यांनी कात्रीने तो कापून टाकला आणि अंगठी एका कागदात गुंडाळून ठेऊन दिली. मोबाईल काढून घेतला गेला. तो जमा करताना पटकन मला तो बंद करता येईना. मी शेवटचा मोबाईल केव्हा बंद केला होता तेच आठवेना.

दहा दिवसांच्या विपश्यनेची अशी ही सुरुवात. दहा दिवस मौन पाळायचे. संध्याकाळी जेवण नाही फक्त मका आणि कुरमुऱ्याचा थोडा चिवडा, एखादे फळ आणि दूध. पहाटे चार वाजता उठायचे. साडेचार पासून ध्यानाला सुरुवात. साडेसहा वाजता नाश्ता, अकरा वाजता जेवण आणि सायंकाळी पाच वाजता नाश्ता. रात्री साडेनऊ वाजता झोपी जायचे. दिवसभरात जवळ जवळ दहा तास ध्यानसाधना. शारीरिक आणि मानसिक पातळीवर शस्त्रक्रियेला नकळत सुरुवात झाली होती. मोबाईल वापरायला सुरुवात केल्यापासून सलग दहा दिवस मोबाईलपासून दूर राहण्याचा हा पहिलाच प्रसंग. कधी कधी दुर्गम भागात भटकंतीला गेलो असताना रेंज नसल्याने तीन- चार दिवस मोबाईल वापरला जायचा नाही तरी पण फोटो काढायला का होईना मोबाईल जवळ असायचाच. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत सतत जवळ असणाऱ्या आणि जणू काही आपल्या शरीराचाच एक भाग झालेल्या मोबाईलशिवाय कसं राहता येणार हा एक प्रश्नच होता. मोबाईल नसल्याने सकाळी उठण्यासाठी एक साधं गजराचं घड्याळ सोबत नेलं होतं. राहण्यासाठी स्वतंत्र टुमदार खोली होती. त्यात एक पलंग, एक खुर्ची, बाथरुम आणि गिझरची सोयही होती. सोबत वही, पेन, पुस्तक, फोटो असलं काहीही न्यायचं नव्हतं. पहाटे ४ वाजता घंटा वाजायची. खोलीच्या बाहेर छोट्या घंटीचा नाद करत सेवक उठायची वेळ झाली हे सांगायचे.

तिथे मौनाला आर्यमौन असं म्हणतात. म्हणजे वाणीने नव्हे तर शारीरिक हातवारे करुनही बोलायचं नाही. तुम्हाला काही शंका असतील तिथल्या गुरुजींशी ठरलेल्या वेळेत हळू आवाजात त्या विचारता येतात.

दहा दिवस जणू एखाद्या बेटावर राहिल्यासारखे! समोर माणसं दिसतात, पण त्यांच्याशी बोलता येत नाही. कोणत्याही प्रकारे संपर्क करता येत नाही. दूरवरच्या आपल्या माणसांशी संपर्क करण्याचा प्रश्नच नाही. जगाची कोणतीही बातमी तुमच्यापर्यंत पोहोचत नाही. तुम्ही पूर्ण एकटे पडता. हा अनुभव अक्षरशः डोळे उघडणारा असतो. असं पूर्ण वेळ स्वत:सोबत राहण्याची सवय कुठे असते आपल्याला? सतत बहिर्मुख असणारं आपलं मन आणि त्यात आता सोशल मीडिया, टीव्ही, मोबाईलमुळे अथकपणे बाहेर पाहण्याची आपली सवय. या एकांतातला एक एक तास हा एक एक दिवसासारखा भासायला लागतो. दिवसभरातला थोडा वेळ विश्रांती मिळायची तेव्हा रुमवर येणं व्हायचं. रुमवर येऊन काय करायचं हा प्रश्नच असायचा. निसर्गाच्या सानिध्यात असलेली ती खोली एखाद्या तुरुंगासारखी भासायला लागे. मोबाईल नाही, लॅपटॉप नाही, टीव्ही नाही, रेडिओ नाही, साधं पुस्तकही नाही की पेन नाही. रुमवर इलेक्ट्रिकचे दोन पॉइंट होते. मी त्यांच्याकडे शून्य नजरेने पाहत राहायचो. त्या ठिकाणी मनाला चार्ज करण्याशिवाय



माझ्याकडे काहीच नव्हतं.

करण्यासारखं काहीच नसल्यामुळे अगदी खुळावल्यासारखं व्हायचं. मग वेळ काढायला खुर्चीत बसून खिडकीतून दिसणारी झाडाची फांदी पाहत बसायचे. सतत कशात तरी मन रमवायची सवय लागलेल्या मन आणि शरीरासाठी हा एकटेपणा अक्षरशः अंगावर यायला लागतो. काहीही न करता स्वत:सोबत बसून राहणं किती अवघड आहे हे उमगायला लागतं. तिसऱ्याच दिवशी काहीतरी आतून तुटायला लागलं. काही कारण कळेना. एखादी जखम उघडी केल्यावर आतलं सगळं दूषित रक्त वाहू लागतं तसं काहीतरी मनाच्या पातळीवर जाणवू लागलं. निचरा होत असल्यागत. खूप विलक्षण अनुभव!

कपड्यांचे सात-आठ जोड नेले होते. तिथे लाँड्रीची सोय होती. पण उन्हाळ्याचे दिवस असल्याने रात्री धुतलेले कपडे दुसऱ्या दिवशी सकाळी वाळायचे. कोणीच कोणाकडे पाहत नसल्याने किंवा बोलत नसल्याने आपण काय घातले आहे याची कोणालाच फिकीर नव्हती. दहा दिवसांसाठी दोन साधे खादीचे सदरे आणि दोन सुती विजारी, एवढेच कपडे वापरले गेले. बाहेर पाहणं कमी करून आत पाहायला लागलं की लक्षात येतं की आपल्या गरजा किती कमी आहेत. इगतपुरी धम्मगिरीचा परिसर अतिशय रम्य आहे. तिथली रचना अशी आहे की लांबवर दृष्टी टाकली तरी डोंगर आणि निसर्गाशिवाय दुसरं काही दिसत नाही. बाहेरच्या जगाशी पूर्ण संपर्क तुटला जातो. कोणत्याही बातम्या तुमच्यापर्यंत पोहोचत नाहीत. आपल्या आप्तांविषयी मनात विचार येत असतात. नोकरी, धंदा, मित्र परिवार याविषयी विचार येत राहतात. याचं काय झालं असेल आणि त्याचं काय झालं असेल. मी नसताना बाहेरच्या जगात काय चाललं आहे. मी नसल्यामुळे कोणाचे आणि काय अडत असेल? असे अनेक विचार मनार रुंजी घालत असतात. आणि दहाव्या दिवशी फोन हातात आल्यावर जेव्हा समजतं की तुमच्याशिवाय जगात सगळं अतिशय उत्तम सुरू आहे, कोणाचं काहीही अडलेलं नाही तेव्हा तुमचा अहं नकळत दुखावतो. आपण करत असलेल्या अनेक निरर्थक गोष्टीतली व्यर्थता लक्षात यायला लागते. जे मनाचं तेच शरीराचं. त्याला तरी एका जागी स्थिर बसण्याची कुठे सवय आहे. शांतपणे कुठलाही विचार न करता एका ठिकाणी तासभर बसणं सुद्धा कष्टप्रद असतं. म्हणजे चित्रपट किंवा क्रिकेट सामना वगैरे आपल्या आवडत्या गोष्टी करायला आपण तासन्तास एका जागी बसू शकतो, पण मनात काहीही विचार न आणता शांतपणे एका ठिकाणी बसायचं म्हटलं की शरीर बंड करून उठतं.

रोज जवळपास दहा तास ध्यान करायचे. मन स्थिर करण्यासाठी आपल्या श्वासांचीच मदत घेऊन त्याकडे साक्षीभावाने पाहत राहायचे. सायंकाळी गोयंका गुरुजींची रेकॉर्डेड प्रवचने असायची. विपश्यनेविषयी आपल्या मनातल्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यात मिळत असत. अत्यंत मधाळ आणि भारदार आवाजातील या प्रवचनांची रोज ओढ लागलेली असायची.

धम्मगिरीमधे कुठेही कुठलीही मूर्ती नाही किंवा तसबीर नाही किंवा आकृती नाही. पॅगोडामध्ये तरी एखादी मूर्ती असेल असे वाटले होते तर आत गेल्यावर समजले की, तिथे कुठलीही मूर्ती नसून केवळ ध्यानाची शुन्यागारे आहेत. त्या शुन्यागारातल्या अंधारात शांतपणे बसून ध्यान करण्याचा अनुभव शब्दातीत आहे. अनित्य/अस्थिर असणे हा वैश्विक नियम आहे. या विश्वात सतत बदल होत आहे. अगदी अणूरेणू पासून ते सूर्यमालेच्या पलिकडच्या अथांग विश्वात सतत बदल होत असतो. तोच नियम आपल्या शरीरातल्या पेशी पेशींना लागू आहे. जुनं नष्ट होणं आणि नवीन निर्माण होणं हेच सत्य. आपल्या साऱ्या विकारांचा उगम मनात आणि शारीरिक पातळीवर होत असतो. सगळं अनित्य आहे हे बुद्धीच्या पातळीवर लक्षात आलं तरीही आसक्ती आपल्या मनातून जात नाही. आपला मीपणा सुटत नाही, अहं जात नाही.

आपल्या विकारांचं आणि आपल्या शरीराचं खूप जवळचं नातं आहे. सर्व विकारांचं मूळ कुठेतरी शारीरिक संवेदनांमधे दडलेलं असतं. म्हणजे एखाद्याला तंबाखूचं व्यसन आहे असं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्याला खरं तर तंबाखूचं व्यसन नसून ती खाल्ल्यामुळे त्याला शारीरिक पातळीवर जे काही नशा किंवा किक वगैरे सुख वाटतं त्या संवेदनांचं व्यसन असतं. कुठल्या तरी देवामुळे किंवा साधुमुळे किंवा कोणी सांगितलं म्हणून तुम्ही तंबाखू सोडली तरी ते वरवरचं दमन झालं. आत सुप्त तुमची जी भावना आहे त्यापासून तुम्ही मुक्त झालेला नसता. या शरीर पातळीवरच्या संवेदनांकडे आपण कधी जाणीवपूर्वक लक्ष देत नाही.

धर्म म्हणजे केवळ पोथ्या, उपवास, भजन जप, वाऱ्या, यात्रा नव्हे. हे सगळं करण्यात गैर काहीच नाही. परंतु हे करत असताना आपण त्यामागचा खरा अर्थच विसरुन जातो आणि केवळ कर्मकांडात अडकून राहतो. तोच धर्म आहे असे आपल्याला वाटू लागते. हे सगळं आपण फार विचारपूर्वक करत असतो असंही नाही. दुसरं कोणीतरी करतं किंवा सगळे करतात किंवा कोणीतरी सांगितलं म्हणून आपणही ते करत असतो. याची दुसरी गोची अशी की, पुन्हा आपण जे करत असतो त्या कर्मकांडाबद्दलच आपल्याला आसक्ती निर्माण होते आणि आपलाच मार्ग कसा श्रेष्ठ असा नवा विकार जन्माला येतो. आपली साधना किंवा श्रद्धेच्या बाह्य खुणा शरीरावर किंवा वस्त्रांवर बाळगणे हे सुद्धा मनाच्या कमकुवतपणाचेच लक्षण! गुरुजींची प्रवचनं ऐकताना मनातल्या अनेक प्रश्नांची उत्तरं मिळायला लागतात. पहिल्याच दिवशी मनगटावरचा धागा आणि अंगठी का काढायला लावला याचं कारण समजायला लागतं. पण विकार आणि शारीरिक पातळीवरील या संवेदनांकडे साक्षीभावाने पाहायला शिकलं की, या विकारांच्या मुळावर घाव घालण्याची शक्यता निर्माण होते.

**हाताच्या मनगटावरचा धागा आणि बोटातली अंगठी काढून टाकावी लागेल, असे इगतपुरीला विपश्यनेच्या पहिल्याच दिवशी नाव नोंदणी करताना तिथल्या धम्म सेवकांनी सांगितलं.**



'विपश्यना' या शब्दाचा अर्थ आहे विशेष प्रकारे पाहणे. सत्य पाहणे व जराही विचलीत न होणे. तटस्थपणे, अलिप्तपणे, निर्विकारपणे पाहणे. ही मन आणि चित्त शुद्ध करण्याची साधना आहे. त्याचा कोणत्याही धर्माशी, पंथाशी, नावाशी, आकृतीशी संबंध नाही.

बुद्धीच्या पातळीवर अनेक संकल्पनांचं पांडित्य आपल्याकडे असतं. पण प्रत्यक्ष त्याची व्यवहारात आणि शारीरिक पातळीवर अंमलबजावणी होतेच असं नाही, किंबहुना ती अतिशय कठीण असते. त्यासाठी लागणारा एकांत आणि मन अंतर्मुख करण्याची संधी आपल्याला क्वचितच मिळते. नेमकी हीच गोष्ट या दहा दिवसांत आपल्याकडून करवून घेतली जाते. मानसिक आणि शारीरिक पातळीवरचा हा एकांत सुरुवातीला अतिशय जड जातो. मन आणि शरीर क्षणोक्षणी बंड करून उठते. तिथून पळून यावे असे विचार अनेकदा मनात येतात. दोन-तीन दिवसात मात्र याची एकदा सवय झाली की, या एकांतातली गोडी लक्षात यायला लागते. या कोर्सची कुठलीही फी आकारली जात नाही. फी भरली की, पुन्हा अहंकार जागा होतो. एखाद्या भिक्षुकाप्रमाणे आपण तिथे राहतो. कोणीतरी आधी दान केलेलं असतं त्याने तुमची सोय झालेली असते. विपश्यना शिकवण्याची कोणतीही फी नसली तरी राहण्याखाण्याचा खर्च आहेच. तुम्हाला कोर्स आवडला आणि आपल्यासारखाच इतरांना याचा उपयोग व्हावा असं वाटलं तर शेवटच्या दिवशी दुसऱ्या कोणासाठी दान करावे. त्याची कोणतीही सक्ती नाही.

दहाव्या दिवशी मौन समाप्त झाले. मोबाईल हातात आला तरी तो पटकन सुरू करावा वाटेना. दहा दिवस जी असीम शांतता अनुभवली होती ती तशीच पुढे चालू ठेवावी असं वाटत होतं. घरी फोन करून खुशाली विचारली. सगळं ठिकठाक होतं. घरी, दारी सगळं छान चाललं होतं. माझ्यावाचून कोणाचं अडलं नव्हतं की कोणावाचून माझंही अडलं नव्हतं.

पुन्हा फोन बंद केला. दहा दिवस पेपर पाहिला नव्हता की, कोणतीही बातमी ऐकली नव्हती. घर नव्हते की ऑफीस. व्हॉट्सअॅप, युट्युब, फेसबुक, इन्स्टाग्राम, शेअर मार्केट काहीही नव्हते. माहितीचे सर्व स्त्रोत बंद होते आणि त्यामुळे काहीही बिघडले नव्हते. उलट मन अगदी शांत झाले होते. लक्षात आले की, कितीतरी अनावश्यक गोष्टींचा कचरा मी रोज मनात जमा करत होतो. अनेक बातम्या आणि माहिती ज्याचा माझ्या दैनंदिन आयुष्यात काहीच उपयोग नव्हता त्यावर मी चर्चा करत होतो आणि वाद घालत होतो. यामुळे निष्कारण आपल्याच जवळच्या माणसांबद्दल मनात उगाच अढी बाळगून होतो.

केवळ दहा दिवस हे सगळं बंद झालं तर इतकं शांत वाटत होतं. एकांत आणि मौनातला आनंद काय असतो याची प्रचिती आली होती. अकराव्या दिवशी तिथून बाहेर पडताना उगाचच डोळे वाहत होते. त्याचं नेमकं कारण कळत नव्हतं, पण आतून अगदी शांत वाटत होतं. सगळा गाळ तळाशी बसल्यावर पाणी स्वच्छ होते तसं. पण गाळ तळाशी आहेच ही जाणीवही मनात होती. त्यावर मात करण्यासाठी साधनेत सातत्य ठेवायला हवं!

---

## मुंबईतील स्मशानभूमीत कार्बनमुक्त दाहिनी प्रणाली



■ मुंबई

**स्मशानभूमींमधून** होणारे वायू प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबई महापालिकेने कार्बनमुक्त शवदाहगृह वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली (सीएपीएस) बसवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या यंत्रणेच्या पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयनाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

अंत्यसंस्कार प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारा धूर, राखेचे सूक्ष्म कण आणि इतर प्रदूषक घटक कमी करण्यासाठी 'सीएपीएस' प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. या माध्यमातून उत्सर्जित धुराचे शुद्धीकरण करून पर्यावरणावरील परिणाम कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये सध्या एकूण २०१ स्मशानभूमी असून, त्यामध्ये ७० हिंदू, ७४ मुस्लीम, ५२ ख्रिश्चन आणि इतर ५ स्मशानभूमींचा समावेश आहे. यापैकी १७ गॅसवर आधारित आणि ६ विद्युत स्मशानभूमी आहेत.

## कपिल शर्मा यांच्या अमृतसर येथील घराबाहेर गोळीबार झाल्याचा दावा

■ अमृतसर

**प्रसिद्ध** कॉमेडियन कपिल शर्मा यांच्या अमृतसर येथील घराबाहेर कथित गोळीबार झाल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना सोमवारी रात्री घडल्याचे सांगितले जात आहे.

बाईकवर आलेल्या काही अज्ञात व्यक्तींनी कपिल शर्मा यांच्या होली सिटी परिसरातील घराबाहेर गोळ्या झाडल्या. त्यावेळी घरात कपिल शर्मा यांचे कुटुंब उपस्थित होते, तर कपिल शर्मा शूटिंगनिमित्त मुंबईत असल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाल्याचे वृत्त नाही. मात्र या घटनेबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी अद्याप अधिकृत माहिती देणे टाळले आहे.

## रसायनशास्त्र-भौतिकशास्त्र विभागांचा स्वायत्त दर्जा कायम

मुंबई विद्यापीठाचा निर्णय

■ मुंबई

**मुंबई** विद्यापीठाच्या रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र विभागांचा स्वायत्त दर्जा कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे दोन्ही विभागांच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांना पुन्हा एकदा मान्यता मिळाली आहे.

रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र हे मुंबई विद्यापीठातील अत्यंत प्रतिष्ठित आणि संशोधनाभिमुख विभाग मानले जात आहे. या निर्णयामुळे त्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने अभ्यासक्रमात सातत्याने सुधारणा, उद्योग आणि संशोधन संस्थांशी समन्वय, आधुनिक प्रयोगशाळा सुविधा तसेच विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य या विभागांकडून सुरू आहे.

याच पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने स्वायत्त दर्जा पुढेही कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर एसटीने दुचाकीला चिरडले



■ जुन्नर

**४ ठार**

**अहिल्यानगर - कल्याण** महामार्गावर राज्य परिवहन मंडळाची (एसटी) बस आणि दुचाकी यांच्या आज सकाळी झालेल्या अपघातात चार जण जागीच ठार झाले. जुन्नर तालुक्यातील डिंगोरे येथे घडलेल्या या भीषण अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली. दुचाकीवरून चार जण आळेफाटा येथून कल्याणच्या दिशेने चालले होते. त्याचवेळी कल्याणहून आळेफाट्याकडे जाणारी एसटी बस येत होती. डिंगोरे परिसरात अचानक दुचाकी आणि एसटी बस समोरासमोर आल्याने जोरदार धडक झाली.

हा अपघात एवढा भीषण होता की, दुचाकीवरील चारही जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. मोठा आवाज ऐकल्याने परिसरातील नागरिक तातडीने घटनास्थळी धावले. स्थानिकांनी जखमींना मदत करण्याचा प्रयत्न केला. मात्र धडक एवढी गंभीर होती की जखमींना रुग्णालयात हलवण्याआधीच त्यांचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार दुचाकीवरील चारही जण हे मजूर होते.नेहमीप्रमाणे काम आटोपून ते घरी परतत होते.

## उरण भगवामय! हिंदू विराट संमेलनाने तालुका दणाणला

■ उरण

**उरणच्या** भूमीवर हिंदुत्वाचा जणू ज्वालामुखीच उसळला! सकल हिंदू समाज, उरण तालुकाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या हिंदू विराट संमेलनाने उरण शहर अक्षरशः भगव्या रंगात न्हाऊन निघाले. पेन्शन पार्कजवळील उरण नगरपालिका शाळेच्या विस्तीर्ण मैदानावर भरलेल्या या महासंमेलनात हजारो हिंदू बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेत हिंदू एकतेची प्रचंड ताकद दाखवून दिली.

सायंकाळपासूनच उरण शहरात भगव्या झेंड्यांची लयलूट पाहायला मिळत होती. 'जय श्रीराम, जय शिवराय' आणि 'हर हर महादेव'च्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण उरण दणाणून गेले होते. शहराच्या प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने अवघ्या उरणला भगवामय केले. भगवी उपरणी परिधान केलेले युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांचा उत्साह पाहून हा केवळ कार्यक्रम नसून हिंदुत्वाचा महासागर उसळल्याचे चित्र निर्माण झाले होते.

शोभायात्रेदरम्यान अनेक ठिकाणी फुलांची उधळण करण्यात आली. भगव्या ध्वजांनी सजलेले रस्ते, ढोल-ताशांचा कडकडाट आणि घोषणांचा गजर यामुळे वातावरण पूर्णपणे भारावून गेले होते. 'हिंदू एकता जिंदाबाद'च्या घोषणांनी उरण शहरातील प्रत्येक चौक दणाणून निघत होता. मैदानावर उभारण्यात आलेले दिमाखदार व्यासपीठ हे संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरले. एका बाजूला सिंहारूढ भारतमाता तर दुसऱ्या बाजूला हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य प्रतिमा उभारण्यात आली होती. मध्यभागी झळकणारा संघ शताब्दी वर्ष आणि राष्ट्र प्रथमचा संदेश उपस्थितांना हिंदुत्व आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देत होता. व्यासपीठावरील संत-महंत आणि मान्यवर वक्त्यांनी हिंदू संस्कृती, धर्म आणि राष्ट्रनिष्ठेवर प्रभावी भाष्य केले. केवळ इतिहासात रमू नका, संस्कृती रक्तात भिनवा, असा संदेश देत हिंदू समाजाने एकत्र येण्याची काळाची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



भारत भेटीवर असलेले अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो आणि त्यांच्या पत्नी जेनेट यांनी आग्रा येथील ताजमहालला भेट दिली, त्यावेळी आपले छायाचित्र काढून घेतले.

## वाकोल्यातील पालिकेच्या गोदामात सीसी कॅमेरे बसविणार



■ मुंबई

**वाकोल्यातील** मार्केट (मंडई) इमारत परिसरात असलेल्या महापालिकेच्या गोदामात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सीसी कॅमेरे लावण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

खार, वाकोला, वांद्रे, कालिना या भागांत अनधिकृतपणे व्यवसाय करणारे फेरीवाले, तसेच टपऱ्या व चारचाकी हातगाडीवाले यांचा जप्त केलेला माल पालिकेच्या गोदामामध्ये जमा केला जातो. हा जप्त केलेला माल सोडविण्यासाठी रात्री ८ नंतर मोठ्या संख्येने टपरीवाले व फेरीवाले गोदामाबाहेर गोळा होतात. काहीजण आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न करतात. सुरक्षा रक्षकांनी अडविण्याचा प्रयत्न केला तर फेरीवाले हमरातुमरीवर येतात. या गोदामाची जागा मोकळी आहे. वर छप्परही नाही. विजेचे दिवे नाहीत. फक्त लोखंडी गेट आहे. त्यामुळे जप्त केलेल्या मालाची अफरातफर झाल्यास जबाबदार कोण? यावर उपाय म्हणून वाकोल्यातील पालिका गोदामाच्या आत सीसी कॅमेरे लावण्याचा निर्णय पालिकेच्या वरिष्ठ पातळीवर घेण्यात आला आहे.

## पतंगशहा कुटीर रुग्णालयात आरोग्यसेवा कोलमडली

■ जव्हार

**जव्हार** येथील पतंगशहा कुटीर रुग्णालयातील अपुऱ्या आरोग्य सुविधा, बंद पडलेली लिफ्ट आणि कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांसाठी महत्त्वाचे मानले जाणारे हे रुग्णालय सध्या गंभीर समस्यांच्या गर्तेत असल्याचे चित्र आहे.

त्यामुळे संतप्त नागरिकांच्या शिष्टमंडळाने वैद्यकीय अधीक्षक कार्यालयात धडक देत प्रशासनाविरोधात तीव्र निषेध नोंदवला. रुग्णालयातील लिफ्ट बंद असल्याने गर्भवती महिला,

**नागरिकांचा संताप**

वृद्ध तसेच गंभीर रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार केली. शिष्टमंडळाच्या म्हणण्यानुसार, अपघातग्रस्त, फ्रॅक्चर, सर्पदंश तसेच भाजलेल्या रुग्णांसाठी आवश्यक प्राथमिक उपचार सुविधा अपुऱ्या असल्याने रुग्णांना नाशिक, ठाणे किंवा मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जावे लागत आहे. तसेच एमआरआय, सीटी स्कॅन आणि रक्तघटक विभाजन केंद्रासारख्या अत्यावश्यक सुविधा रुग्णालयात उपलब्ध नाही. दरम्यान, शिष्टमंडळ रुग्णालयात पोहोचले असता काही अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असल्याचे आढळून आले, ज्यामुळे नागरिकांचा संताप अधिक वाढला. याप्रकरणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमेश पाटील यांनी नागरिकांशी चर्चा करून समस्या वरिष्ठ पातळीवर मांडण्याचे आश्वासन दिले आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अपघातांचा थरार! ढिम्म सरकार

राज्यात वेगवेगळ्या विकासकामांचे ढोल बडवले जात असतात. परंतु या विकासकामांच्या भाऊगर्दीत काही महत्त्वाच्या मुद्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे म्हणावे लागेल. आणि त्यातला अतिशय संवेदनशील आणि गंभीर मुद्दा म्हणजे राज्यांमध्ये वाढत असलेले रस्ते अपघात. घडणारे सगळेच अपघात हे तांत्रिक कारणांवरूनच घडतात असे नाही. रविवारी राज्यात तीन ठिकाणी मोठे वेगवेगळे विचित्र अपघात झाले. त्यात तब्बल सतरा जणांचे बळी गेले आहेत. याशिवाय कणकवली, बुलडाणा, वर्धा, या भागातही छोटे रस्ते अपघात झाल्याचे वृत्त आले आहे. या सगळ्या अपघातांची कारणे देताना दोनच प्रमुख कारणे समोर येताना दिसतात. वाहनांची भरधाव वेग आणि चालकाचे वाहनावरचे सुटलेले नियंत्रण अशी दोनच प्रमुख कारणे या सतरा जणांचा बळी घेणारी ठरली आहेत. बऱ्याच वेळेला अपघातांना दुर्दैवी घटना ठरवली जाते. त्यातल्या मृतांच्या नातेवाईकांना आणि जखमींना मदत देण्याची सहानुभूती दाखवली जाते. आणि मग अपघात हे कसे नित्याचेच प्रकार आहेत, असे समजून त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते. जर विकसित महाराष्ट्र घडवायचा असेल तर अपघातांचे प्रमाण शून्यावर आणावे लागेल. एकीकडे पुणे, मुंबई, रस्त्यावरची कोंडी दूर करण्याकरीता पंचवीस-तीस हजार कोटी खर्चून मिसिंग लिंक तयार होते. कारण या महामार्गावर वाहनांची संख्या जास्त असते. परंतु रस्ते विकासाचा कार्यक्रम राबवताना होणारा दुजाभाव किंवा इतर अनेक महत्त्वाच्या रस्त्यांच्या विकासाकडे होणारे दुर्लक्ष हे या अपघातांना आमंत्रण देते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सरकारला रस्ते अपघात रोखण्यासाठी आपली रस्ते वाहतूक शाखा अधिक कार्यक्षम करावी लागणार आहे. कारण एकूणच राज्यातील वाहनांची संख्या वाढते आहे, त्याप्रमाणात रस्त्यांची संख्या वाढत नाही आणि या सगळ्या रस्त्यांवर वाहनांच्या वेगांवर नियंत्रणही राहू शकत नाही. जेवढे काही अपघात होतात, त्यांत वाहनांचा अमर्याद वेगच कारणीभूत असतो.

**तंत्रज्ञानातून वेगावर नियंत्रण शक्य**

आज वाहन उद्योगामध्ये अगदी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वाहनांची भर पडते आहे. वाहन बनवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येऊन भरपूर पैसा कमावतात. महागड्या आलिशान गाड्या तयार करत असताना त्यासाठी आवश्यक असणारे उत्तम दर्जाचे रस्तेदेखील गरजेचे आहेत. वाहन उद्योगातून सरकारला कराच्या रूपानेदेखील भरपूर महसूल मिळतो. परंतु त्याच वाहन उद्योगामुळे देशभरात होणाऱ्या मनुष्यहानीत सतत भर पडते आहे. वाहन उद्योगामुळे रोजगार निर्मिती होते, असा दावा सरकारतर्फे केला जात असतो. परंतु यातला विरोधाभास इतका धक्कादायक आहे की, त्या रोजगारनिर्मितीच्या प्रमाणात अपघातात बळी पडणाऱ्यांची संख्या जास्त वाटू लागते. दरवर्षी दीड लाख लोक अपघातांमध्ये प्राण गमावतात. परंतु दीड लाख रोजगार दरवर्षी वाहन उद्योगातून निर्माण होतो का, याचादेखील विचार करण्याची वेळ आलेली आहे. वाहने ही आवश्यक आहेत. इतर अनेक कामांसाठी वाहनं गरजेची ठरतात. परंतु सांगण्याचा मुद्दा असा आहे की, जी वाहने गरजेची आहेत, त्याच वाहनांच्या सुरक्षिततेची तितकीच काळजी आवश्यक ठरते. ज्याप्रमाणात अपघात होत आहेत ते पाहिल्यावर या अपघातांची सगळी जबाबदारी वाहन चालक किंवा मालकावर टाकून सरकारला मोकळे होता येणार नाही. सगळ्या प्रमुख रस्त्यांवर चोवीस तास गस्त घालणारी पोलीस यंत्रणा अत्यंत आवश्यक झालेली आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांचा शोध घेता येऊ शकतो. एवढेच नव्हे तर वाहन उद्योगांना सांगून वेगमर्यादा ओलांडल्यानंतर धोक्याची सूचना देण्याची यंत्रणाही वाहनांमध्ये बसवता येऊ शकते. ज्याप्रमाणे खासगी वाहनात सीट बेल्ट जर लावेपर्यंत विशिष्ट आवाज येत राहातो. तो आवाज सीट बेल्ट लावण्याचीच सूचना देत असतो. अशाच प्रकारची यंत्रणा बसवून वाहनांच्या वेगांना तंत्रज्ञानामार्फत ब्रेक लावता येऊ शकेल. म्हणजेच सरकारी पातळीवर अपघात रोखण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देणे आणि वाहतूक पोलिसांची चोवीस तास गस्त असणे हे दोन महत्त्वाचे उपाय तातडीने करता येऊ शकतात. परंतु सरकारला त्याचे फारसे गांभीर्य दिसत नाही.

**एकही पोलीस पथक नाही**

अपघात हे अपघात असतात. किंवा त्यांना दुर्घटना ठरवून सरकारला आपली जबाबदारी झटकायची असते. समृद्धी महामार्ग बांधल्यानंतर सुरुवातीच्या महिनाभरातच या अमर्याद वेगामुळे अनेक वाहनांचे अपघात झाले आणि पन्नास एक लोकांचे बळी गेले. ही बाब लक्षात येताच सरकारने समृद्धी महामार्गावर पोलीस यंत्रणा तैनात केली. वेगावर नियंत्रण आणले म्हणजेच वाहनांवर लक्ष ठेवले गेले आणि अपघातांची संख्या कमी झाली. हे जर उदाहरण समोर असेल किंवा एखादी समस्या समजून घेऊन त्यावर केला जाणारा उपाय सकारात्मक परिणाम देत असेल तर सरकारने तितकीच तत्परता दाखवून उपाययोजना केली पाहिजे. दुर्दैवाने अशा प्रकारच्या तातडीच्या उपाययोजना सरकार करत नाही. वेड पांघरून पेडगावला जाण्याची सरकारची भूमिका असते. इतकी मोठी मनुष्यहानी होते. त्यात अक्षरशः निष्पाप लोकांचे निष्कारण बळी जातात. आताच्या आंबेनळी घाटातला अपघात तर अशाच दुर्लक्षितपणाचा गंभीर प्रकार ठरतो. हा अपघात झाला याचा बराच काळ कोणाला थांगपत्ता नव्हता. बऱ्याच काळानंतर अपघाताची माहिती मिळाली आणि मदतकार्य सुरू झाले. याच ठिकाणी जर पोलिसांचे गस्त पथक असते तर अपघातग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवता आली असती किंबहुना अनेकांचे जीवही वाचू शकले असते. धुळ्याजवळच्या लळिंग घाटातल्या अपघातालाही अशीच पार्श्वभूमी आहे. हजारो वाहनांची ये-जा चालू असते. आणि एकही पोलीस पथक शेकडो किलोमीटरपर्यंत बघायला मिळत नाहीत किंवा मदतीसाठीसुद्धा उपलब्ध होत नसते. वाढत्या अपघातांमागे सरकारची असंवेदनशिलताच कारणीभूत ठरते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

परिस्थिती कशीही असू द्या,
फक्त चेहऱ्यावर शांतता आणि अंगात संयम ठेवा.
परिस्थिती तुमच्या समोर झुकल्याशिवाय राहणार नाही.

## पंचांग

**मंगळवार, २६ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

रवी उदय- ०६-०३
रवी अस्त- १९-०९



* अधिक ज्येष्ठ शुक्ल एकादशी
नक्षत्र : हस्त

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कन्या

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### दुधी भोपळ्याचे धिरडे



★ **साहित्य :** १ कप रवा, १/२ कप दही, १/२ कप पाणी, १/२ कप किसलेला दुधी, १/२ कप किसलेला गाजर, १ कांदा चिरलेला, २ चमचा चिरलेली कोथिंबीर, १/२ आले आणि २ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा हळद, चवीनुसार मीठ, १/२ इनो फ्रूट सॉल्ट, तडक्यासाठी- २-३ चमचा तेल, १ चमचा मोहरी, १ चमचा तीळ, कढीपत्ता.

★ **कृती :** दुधी स्वच्छ धुवून घ्या, त्याची साल काढा आणि मग किसून घ्या. त्यानंतर एका भांड्यात रवा, दही, पाणी घालून मिश्रण एकजीव करून घ्या आणि १५ मिनिटे भिजविण्यासाठी ठेऊन द्या. नंतर त्यात किसलेला दुधी, गाजर, कांदा, कोथिंबीर आणि हिरव्या मिरच्या, हळद, मीठ, इनो फ्रूट सॉल्ट त्यात घाला. गॅस चालू करा. त्यावर पॅन ठेवा. पॅनमध्ये तेल, मोहरी, तीळ, कढीपत्ता टाकून फोडणी घाला. ती फोडणी तडतडली की त्यावर दुधी भोपळ्याचे मिश्रण धिरड्याप्रमाणे पसरवा. पाच मिनिटे ते चांगले शेकू द्यावे. त्यानंतर ते पलटी मारून पुन्हा खरपूस भाजून घ्यावे. अशाप्रकारे तुमचे दुधी भोपळ्याचे धिरडे तयार.




# क्वॉलिफायरमध्ये बंगळूरू विरुद्ध गुजरात

## कोणता संघ फायनलमध्ये धडक देणार?



**आयपीएल २०२६ मधील प्लेऑफच्या लढतींना २६ मेपासून सुरुवात होत असून, क्वॉलिफायर-१ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स हे दोन संघ धरमशाला येथे आमनेसामने येणार आहेत. गुणतालिकेतील अव्वल दोन संघांमधील ही लढत अत्यंत रंगतदार होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी विजेत्या संघाला थेट अंतिम फेरीचे तिकीट मिळणार आहे. त्यामुळे विराट आणि शुभमन यांच्यापैकी कोण फायनलमध्ये बाजी जाणार याकडे सर्व क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे.**

■ धरमशाला

**हिमाचल** प्रदेशातील धरमशाला मैदानावर पहिल्यांदाच आयपीएल प्लेऑफचा सामना होत असल्याने स्थानिक क्रिकेटप्रेमींमध्येही उत्साह आहे. दोन्ही संघांचे खेळाडू धरमशालात दाखल झाले असून, विमानतळावर चाहत्यांनी मोठ्या संख्येने गर्दी करत आपल्या आवडत्या खेळाडूंचे स्वागत केले.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल या मोसमात शानदार फॉर्ममध्ये आहे. त्याच्या नेतृत्वाखाली गुजरातने सातत्यपूर्ण कामगिरी करत अव्वल दोनमध्ये स्थान मिळवले. संघाची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागांमध्ये संतुलित कामगिरी पाहायला मिळाली आहे. विशेष म्हणजे मधल्या फळीत आणि डेथ ओव्हर्समध्ये गुजरातच्या गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी केली आहे.

दुसरीकडे, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा शेवटच्या साखळी सामन्यात पराभव झाला तरी गुणतालिकेत पहिले स्थान कायम राखण्यात यश मिळवले. अनुभवी विराट कोहली याची दमदार फलंदाजी आणि संघातील अनुभवी खेळाडूंचा आत्मविश्वास हे बंगळूरूसाठी मोठे बलस्थान ठरत आहे. गेल्या हंगामातील विजेतेपदामुळे संघाचा आत्मविश्वास आणखी उंचावलेला दिसत आहे. या सामन्यावर पावसाचे सावटही कायम आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार धरमशाला आणि आसपासच्या भागात मान्सूनपूर्व सरी कोसळण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे क्वॉलिफायर-१, एलिमिनेटर आणि क्वॉलिफायर-२ या सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवण्यात आलेला नाही. फक्त अंतिम सामन्यासाठीच राखीव दिवस आहे.

अशा परिस्थितीत पावसामुळे सामना रद्द झाल्यास गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या बंगळुरू संघाला थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळेल. बंगळुरू आणि गुजरात या दोन्ही संघांचे प्रत्येकी १८ गुण असले तरी नेट रनरेटमध्ये बंगळुरू पुढे आहे. बंगळुरूचा नेट रनरेट +०.७८३ असून गुजरातचा +०.६९५ आहे. त्यामुळे पावसाचा सर्वाधिक फटका गुजरात टायटन्सला बसू शकतो.

## एमसीएफ राज्य कॅरम स्पर्धेत संदीप दिवेचा दबदबा कायम

■ मुंबई

**बोरिवली** येथे सुरू असलेल्या ११व्या एमसीएफ राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत माजी विश्वविजेता संदीप दिवे याने आपला अनुभव आणि अचूक खेळाच्या जोरावर दमदार आगेकूच कायम ठेवली. उपउपांत्य फेरीत मुंबईच्या उदयोन्मुख ओंकार टिळकने पहिला सेट जिंकत आव्हान निर्माण केले. मात्र त्यानंतर संदीप दिवेने शानदार पुनरागमन करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

सामन्याच्या पहिल्या सेटमध्ये ओंकारने आक्रमक खेळ करत संदीप दिवे यांना २५-६ असे धक्का दिला. मात्र त्यानंतर संदीप दिवेने आपल्या खेळाचा स्तर उंचावत दुसरा सेट २५-६ आणि तिसरा सेट २५-३ असा एकतर्फी जिंकत सामना नावावर केला. महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत मुंबईच्या मिताली पाठकने अंबिका हरिथ विरुद्ध रंगतदार विजय नोंदवला. तीन सेटपर्यंत रंगलेल्या या सामन्यात मितालीने २३-९, १८-२५, २५-४ अशा फरकाने विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली.

## फ्रेंच ओपनमध्ये निश बसवरेड्डीचा उलटफेर! टेलर फ्रिट्झ पराभूत

■ पॅरिस

**फ्रेंच** ओपन २०२६ मध्ये भारतीय वंशाच्या अमेरिकन टेनिसपटू निश बसवरेड्डीने शानदार खेळ करत मोठा उलटफेर केला. जागतिक क्रमवारीत १४८व्या स्थानावर असलेल्या निशने सातव्या मानांकित टेलर फ्रिट्झचा चार सेटमध्ये पराभव केला.

रोलँड गॅरोसवरील पहिल्या फेरीच्या सामन्यात २१ वर्षीय निशने सातव्या मानांकित टेलर फ्रिट्झ याचा ७-६ (५), ७-६ (५), ६-७ (९), ६-१ असा पराभव करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संपूर्ण सामन्यात निशच्या अचूक ड्रॉप शॉट्स आणि वेगवान फटक्यांनी फ्रिट्झची लय बिघडवली. गुडघ्याच्या दुखापतीनंतर पुनरागमन करणाऱ्या फ्रिट्झला आपला खेळ उंचावता आला नाही आणि त्याचा फायदा निशने उचलला.

## मुंबई जिल्हा खो-खो स्पर्धेत युवा खेळाडूंच्या कामगिरीची छाप



■ मुंबई

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आयोजित मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत युवा खेळाडूंनी आपल्या दमदार कामगिरीने छाप पाडली. चुरशीच्या आणि रोमांचक सामन्यांनी प्रेक्षकांना थरार अनुभवायला मिळाला, तर वैभव स्पोर्ट्स क्लब, ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर, श्री समर्थ व्यायाम मंदिर आणि ओम साईश्वर सेवा मंडळ यांनी विजयी सलामी देत स्पर्धेत दबदबा निर्माण केला.

स्पर्धेतील पहिल्या सामन्यात वैभव स्पोर्ट्स क्लबने अमर हिंद मंडळाचा ६-२ असा चार गुणांनी पराभव करत विजयी सलामी दिली. वैभवकडून मुग्धा देवळेकर, तन्वी मटकर आणि पूर्वा महाडिक यांनी अष्टपैलू खेळ करत विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. अमर हिंद मंडळाकडून प्रांजल पताडे आणि तनया शिंदे यांनी झुंजार प्रयत्न केले. मात्र त्यांना पराभव टाळता आला नाही. श्री समर्थ व्यायाम मंदिरने आर्य सेनाचा ८-३ असा पराभव करत शानदार विजय मिळवला.

ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आणि सरस्वती कन्या यांच्यातील सामना अत्यंत रंगतदार ठरला. नियमित वेळेनंतर जादा डावात ओम समर्थने ८-५ असा थरारक विजय मिळवला. अवनी पाटील, जिज्ञासा गायकवाड आणि श्रीया ताम्हणकर यांनी निर्णायक भूमिका बजावली. ओम साईश्वर सेवा मंडळाने श्री समर्थ व्यायाम मंदिर 'ब' संघाचा १६-४ असा धुव्वा उडवला.

## इंटर मियामीच्या सामन्यात लिओनेल मेस्सीला दुखापत

**मियामी** - लिओनेल मेस्सी याच्या दुखापतीमुळे फुटबॉल चाहत्यांची चिंता वाढली आहे. २०२६ फिफा विश्वचषक सुरू होण्यास काहीच दिवस शिल्लक असताना इंटर मियामी आणि फिलाडेल्फिया युनियन यांच्यातील सामन्यात मेस्सीला मैदान सोडावे लागले.

सामन्याच्या ७३ व्या मिनिटाला मेस्सीने स्वतःहून बेंचकडे इशारा केला आणि तो मैदानाबाहेर गेला. त्यानंतर तो थेट ड्रेसिंग रूममध्ये गेल्याने चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. इंटर मियामीने हा सामना ६-४ असा जिंकला, मात्र चर्चेचा विषय मेस्सीची तंदुरुस्ती ठरली. मेस्सीला गंभीर दुखापत झालेली नसल्याची माहिती आहे. इंटर मियामीचे प्रशिक्षक गुइलेर्मो होयोस यांनी सांगितले की, मेस्सीला फक्त थकवा जाणवत होता. मैदान जड असल्यामुळे त्याच्यावर ताण आला होता.

## सामन्यादरम्यान हृदयविकाराचा झटका माजी रणजीपटू एस.एल. अक्षयचे निधन

■ बंगळूरू



**कर्नाटकचे** माजी वेगवान गोलंदाज एस.एल. अक्षयचे सामन्यादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ३९ वर्षीय अक्षय हे बंगळूरूमध्ये सुरू असलेल्या केएससीए थर्ड डिव्हिजन सामन्यात सफायर सीसीकडून खेळत होता. चार षटके गोलंदाजी केल्यानंतर त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि ते मैदानाबाहेर गेले. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

अक्षय हे २०१४-१५ मध्ये रणजी ट्रॉफी विजेत्या कर्नाटक संघाचे सदस्य होता. देशांतर्गत क्रिकेटमध्ये वेगवान गोलंदाज म्हणून त्याने वेगळी छाप निर्माण केली होती. २०११ ते २०१३ दरम्यान त्याने कर्नाटककडून सहा प्रथम श्रेणी, तीन लिस्ट-ए आणि नऊ टी-२० सामने खेळले. कर्नाटक राज्य क्रिकेट संघ ने त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत म्हटले की, अक्षय यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कर्नाटकचे उत्कृष्ट प्रतिनिधित्व केले आणि खेळाडू कारकीर्द संपल्यानंतरही समर्पणाने क्रिकेटची सेवा सुरू ठेवली होती. निवृत्तीनंतर अक्षय यांनी प्रशिक्षकाची भूमिका स्वीकारली होती. ते कर्नाटकच्या अंडर-१९ संघासोबत काम करत होते आणि युवा खेळाडूंना मार्गदर्शन करत होते.

## मुंबई महापौर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत आर्यन -विराजची मोहोर

■ मुंबई




**मुंबईतील** दादर येथील कीर्ती कॉलेजमध्ये पार पडलेल्या मुंबई महापौर चषक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत आर्यन मॅटर आणि विराज पावसकर यांच्यासह ७ जणांनी दमदार कामगिरी करत आपली छाप पाडली. १५० हून अधिक खेळाडू सहभागी झालेल्या या स्पर्धेत विविध गटांतील विजेत्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

या स्पर्धेत आर्यन - विराजसह, योगेश गुंड, राजेश शेटे, सेजल बेलवलकर, तन्वी शिंदे, सेजल मकवाना आणि रुबी दास यांनी विविध गटांत सर्वोत्तम लिफ्टरचा किताब पटकावला. पुरुष गटात सब ज्युनिअर स्ट्राँग बॉय हा किताब आर्यन मॅटरने जिंकला, तर ज्युनिअर स्ट्राँग बॉय म्हणून विराज पावसकर याने बाजी मारली. सीनियर स्ट्राँग मॅन किताब योगेश गुंड याला मिळाला. मास्टर स्ट्राँग मॅन म्हणून राजेश शेटे यांचा गौरव झाला. महिला गटात सब ज्युनिअर गर्ल किताब सेजल बेलवलकर हिने पटकावला. ज्युनिअर स्ट्राँग गर्ल म्हणून तन्वी शिंदे हिने विजेतेपद मिळवले. सीनियर स्ट्राँग वुमन किताब सेजल मकवाना हिला, तर मास्टर स्ट्राँग वुमन किताब रुबी दास यांना मिळाला.

बक्षीस वितरण समारंभात मुंबईच्या महापौर रितू तावडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे शिवछत्रपती पुरस्कार, दादोजी कोंडदेव पुरस्कार आणि जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त १४७ आजी-माजी खेळाडू व प्रशिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

## आमीरने फेटाळला 'टॅग'

बॉलीवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आमीर खानने स्वतःला चिकटवलेला 'मेथड ॲक्टर' हा टॅग स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला आहे. एका कार्यक्रमात बोलताना आमीरने त्याच्या अभिनय शैलीबद्दल आणि चित्रपटांच्या पडद्यामागील प्रक्रियेबद्दल मोकळेपणाने संवाद साधला. अभिनयाचे कोणतेही औपचारिक शिक्षण न घेतल्यामुळे स्वतःला 'मेथड ॲक्टर' म्हणवणे अत्यंत अहंकारीपणाचे ठरेल, असे मत त्याने व्यक्त केले.

आमीर म्हणाला की, तो कोणत्याही ठराविक सिद्धांतांनुसार काम न करता स्वतःची एक वेगळी पद्धत वापरतो. त्याच्यासाठी कोणत्याही पात्राची मानसिकता, त्याचा स्वभाव आणि त्याची ऊर्जा समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. चित्रीकरणाचा शॉट सुरू असताना त्या पात्राच्या विश्वात पूर्णपणे शिरणे हीच एक मोठी गोष्ट आहे आणि जर तो त्या झोनमध्ये जाऊ शकला, तर तो स्वतःला भाग्यवान समजतो. शॉट संपल्यानंतर पात्रातून बाहेर पडायला त्याला फार तर १५ ते २० मिनिटांचा वेळ लागतो, त्यामुळे तो आयुष्यभर त्याच पात्रात जगतो हा समज चुकीचा असल्याचे त्याने स्पष्ट केले.



## गोविंदासोबतच करिश्मा घाबरली का होती?




अभिनेत्री करिश्मा कपूर हिने ९० च्या दशकातील तिचा सुपरहिट चित्रपट 'कुली नंबर १' च्या आठवणींना उजाळा दिला आहे. या चित्रपटातील 'हुस्न है सुहाना' या अत्यंत लोकप्रिय गाण्याच्या चित्रीकरणादरम्यानचा तिचा अनुभव तिने एका विशेष कार्यक्रमात शेअर केला. अभिनेता गोविंदासोबत या गाण्यावर नृत्य करताना ती प्रचंड घाबरली होती आणि कमालीची दबावाखाली होती, असा खुलासा तिने केला आहे.

करिश्मा कपूर म्हणाली की, गोविंदा हा भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असा अभिनेता आहे, ज्याच्या नृत्याची स्वतःची एक वेगळी आणि अचूक शैली आहे. त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव आणि नृत्याची लय पकडणे कोणत्याही कलाकारासाठी खूप कठीण असायचे. त्यामुळे 'हुस्न है सुहाना' या गाण्याच्या चित्रीकरणाची वेळ आली, तेव्हा मी खूप नर्व्हस झाले होते; मात्र, गोविंदाने सेटवर नेहमीच सहकार्य केले, ज्यामुळे हे गाणे एक ऐतिहासिक आणि संस्मरणीय गाणे बनू शकले, अशी प्रांजळ कबुली तिने दिली.




## रागातून बनवला 'चष्मे बद्दूर'

**प्रसिद्ध** चित्रपट दिग्दर्शक डेविड धवन यांनी एका विशेष कार्यक्रमात आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. पीव्हीआरद्वारे आयोजित 'द डेविड धवन फिल्म फेस्टिव्हल' अंतर्गत एका गप्पांच्या कार्यक्रमात त्यांनी चित्रपटसृष्टीतील संघर्षावर भाष्य केले. या कार्यक्रमात वरुणने त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी डेविड धवन यांनी सांगितले की, २०१३ मध्ये आलेला 'चश्मे बद्दूर' हा चित्रपट त्यांनी प्रचंड रागात आणि चिडून बनवला होता, कारण त्या काळात त्यांना मोठे कलाकार मिळत नव्हते.

कलाकारांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल बोलताना डेविड धवन म्हणाले की, जेव्हा एखाद्या दिग्दर्शकाचा चित्रपट फ्लॉप होतो, तेव्हा कलाकार त्याच्याकडे पाहून तोंड फिरवतात. गोविंदा याला त्यांनी अपवाद मानले. चित्रपट चालो वा न चालो, गोविंदाने नेहमीच त्यांना साथ दिली आणि 'तू फक्त संहिता लिही' असा धीर दिला, ज्यातून 'शोला और शबनम' सारखा यशस्वी चित्रपट साकारला.

मोठ्या कलाकारांबद्दलचा अनुभव सांगताना ते म्हणाले की, कलाकार त्यांच्या चित्रपटाला थेट नकार देत नव्हते, परंतु काम करण्यास टाळाटाळ करत होते. कलाकारांच्या या भूमिकेमुळे निर्माण झालेल्या कोंडीतून आणि रागातून त्यांनी नवोदित कलाकारांना घेऊन 'चश्मे बद्दूर' बनवण्याचा निर्णय घेतला. या चित्रपटात ऋषी कपूर यांनीही एका भूमिकेसाठी सुरुवातीला संकोच व्यक्त केला होता, पण डेविड धवन यांच्या आग्रहाखातर त्यांनी ती भूमिका स्वीकारली.



## 'किंग'मध्ये रणवीरची एंट्री

**अभिनेता** रणवीर सिंग आणि शाहरूख खान यांच्यातील पडद्यावरील जुळवून आणल्या जाणाऱ्या केमिस्ट्रीबद्दल चित्रपटसृष्टीत अनेक चर्चा रंगत असतात. 'डॉन ३' या चित्रपटातून रणवीरने माघार घेतल्यामुळे निर्माण झालेल्या कायदेशीर वादांनंतर, आता तो शाहरूख खान आणि दीपिका पदुकोण यांच्या आगामी 'किंग' या चित्रपटात एका विशेष भूमिकेत दिसणार असल्याची जोरदार चर्चा इंटरनेटवर सुरू आहे.

रणवीर सिंगने सुमारे दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या चित्रपटाच्या आंतरराष्ट्रीय चित्रीकरणाच्या सत्रादरम्यान एका विशेष भागाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. सुरुवातीला रणवीर दीपिका पदुकोण आणिमुलगी दुआ यांच्यासोबत वैयक्तिक दौऱ्यावर गेल्याचे मानले जात होते. मात्र, चित्रपटाच्या सेटवर त्याला क्रू मेंबर्ससोबत फोटो काढताना पाहिल्यानंतर तो व्यावसायिक कारणासाठी तिथे गेल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

रणवीरची या चित्रपटातील भूमिका केवळ एका साध्या कॅमिओपुरती मर्यादित नसेल. तो या चित्रपटात एका 'रहस्यमय संदेशवाहका'च्या भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे, जो सुहाना खान हिला संकटातून बाहेर पडण्यासाठी मार्गदर्शन करतो आणि चित्रपटाच्या कथेला एक महत्त्वाचे वळण देतो. ही बातमी खरी ठरली, तर शाहरूख खानच्या मुलांसोबत रणवीरचा हा दुसरा प्रकल्प असेल. यापूर्वी त्याने आर्यन खानच्या 'द बॅडॲसेस ऑफ बॉलिवूड' या वेब सीरिजमधून डिजिटल क्षेत्रात पदार्पण केले होते.



## कंगनाने केली ॲशची पाठराखण

**अभिनेत्री** कंगना रणौत हिने कान्स चित्रपट महोत्सव २०२६ मधील ऐश्वर्या राय बच्चनच्या लूकवरून सोशल मीडियावर होणाऱ्या टीकेचा तीव्र निषेध करत ऐश्वर्याची पाठराखण केली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील रेड कार्पेटवर ऐश्वर्याच्या कपड्यांच्या निवडीवरून आणि तिच्या रूपावरून नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केले होते. या वाढत्या टीकेला उत्तर देताना कंगनाने सोशल मीडियावर एक परखड पोस्ट शेअर करत ऐश्वर्याची बाजू मांडली आहे.

कंगनाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर ऐश्वर्याचा यंदाच्या कान्स महोत्सवातील पहिल्या रेड कार्पेटवरील एका निळ्या रंगाच्या गाऊनमधील फोटो शेअर केला आहे. या फोटोसोबत तिने लिहिले की, फॅशन आणि स्टाईल हे स्वतःचे मत किंवा भावना व्यक्त करण्याचे एक माध्यम आहे. हा जीवनाचा आणि स्वतःच्या दृष्टिकोनाचा वैयक्तिक अर्थ असतो. कोणत्याही महिलेला कोणालाही काहीही सिद्ध करण्याची किंवा स्पष्टीकरण देण्याची गरज नसते; ऐश्वर्या या लूकमध्ये अत्यंत सुंदर दिसत आहे. ऐश्वर्यावर टीका करणाऱ्यांवर आणि तिच्या लूकचा न्याय करणाऱ्यांवर कंगनाने जोरदार निशाणा साधला. ज्या लोकांना ऐश्वर्याला दुसऱ्या कोणत्या रूपात पाहायचे आहे, त्यांनी स्वतः काय केले आहे ते दाखवावे; ती येथे कोणाला खूश करण्यासाठी आलेली नाही, ती स्वतःमध्येच एक तेजस्वी आणि वैभवशाली व्यक्तिमत्त्व आहे, असे कंगनाने पुढे म्हटले आहे. कंगनाने घेतलेल्या या भूमिकेचे सोशल मीडियावर अनेकांकडून कौतुक केले जात आहे.





## अक्षय कुमारचा 'सामुक'

**अभिनेता** अक्षय कुमार एका भव्य सायन्स-फिक्शन ॲक्शन थ्रिलर चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. 'सामुक' असे या आगामी चित्रपटाचे नाव असून, याचे दिग्दर्शन कनिष्क वर्मा तर निर्मिती विपुल अमृतलाल शाह करत आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतील हा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी एलियन सर्व्हायव्हल थ्रिलर चित्रपट मानला जात असून, सध्या हा प्रकल्प प्राथमिक टप्प्यात आहे आणि लवकरच त्याचे चित्रीकरण सुरू होणार आहे.

या चित्रपटाच्या माध्यमातून अक्षय कुमार पुन्हा एकदा पूर्ण लांबीच्या भव्य ॲक्शन भूमिकेत परतणार आहे. चित्रपटात सर्व्हायव्हल हॉरर, मिलिटरी रिअलिझम आणि एलियन थ्रिलर अशा अनेक रंजक घटकांचे मिश्रण पाहायला मिळेल. या चित्रपटात केवळ संगणकीय ग्राफिक्सवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष सेटवर प्राण्यांचे आणि एलियनचे नैसर्गिक परिणाम म्हणजेच प्रॅक्टिकल इफेक्ट्स् दाखवण्यावर अधिक भर दिला जाणार आहे.२०२७ मध्ये चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित करण्याचे नियोजन आहे.

## काळाचौकी जिजामातानगरात वीज खंडीत! रहिवासी त्रस्त

मुंबई

**गेल्या** काही दिवसांपासून दक्षिण मुंबईतील विविध भागात वीज खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत. उकाड्याच्या दिवसांमध्ये वीज खंडित झाल्यामुळे रहिवाश्यांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. काल रात्री जिजामाता नगर, काळाचौकी येथे अनेक तासापासून वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे रहिवाशांना प्रचंड उकाड्याचा त्रास सहन करावा लागला.

भर उन्हाळ्यात वीज खंडित झाल्यानंतर लोकांची काय अवस्था होते, याचा बेस्ट प्रशासनाने थोडा तरी विचार करावा, अशी संतप्त प्रतिक्रिया रहिवाशांकडून व्यक्त होत आहे.

## इन्सुलीत 'ओंकार'च्या हल्ल्यात म्हैस ठार

बांदा

**इन्सुली,** वाफोली परिसरात गेल्या काही दिवसांपासून वावर असलेल्या 'ओंकार' हत्तीने पुन्हा एकदा हल्ला करत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. या हल्ल्यात एका म्हशीचा मृत्यू झाला असून वासरू गंभीर जखमी झाले आहे. 'ओंकार' हत्ती गेल्या काही दिवसांपासून बांदा, इन्सुली, वाफोली आणि डेगवे या भागात फिरत असून स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वीही त्याने बांदा आणि वाफोली येथे वाहनांचे नुकसान केले होते.

इन्सुली येथील कुडव टेंब परिसरात, गणपती मंदिराजवळील बागेत उत्कर्षा लक्ष्मण कुडव यांनी नेहमीप्रमाणे आपली म्हैस आणि वासरू बांधून ठेवले होते. मात्र, काल रात्री हत्तीने अचानक हल्ला चढवला. आज सकाळी पाहणी केली असता म्हैस मृत अवस्थेत, तर वासरू जखमी अवस्थेत आढळून आले. घटनास्थळी हत्तीचा वावर असल्याचेही स्पष्ट झाले. या घटनेत कुडव यांचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने पंचनामा केला.


## घरगुती वादातून ४ मुलांना विहिरीत ढकलले! वडिलांचीही आत्महत्या

बुलढाणा

**जळगाव** जामोद तालुक्यातील भाले अंजन गावात एक धक्क्दायक घटना घडली. घरगुती भांडणातून एका इसमाने त्याच्या चार मुलांना विहिरीत ढकळून स्वःता आत्महत्या केली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत. विजय किराडीया या व्यक्तीने आज सकाळी त्याच्या पत्नीला माहेरी सोडले. त्यानंतर, त्याने प्रीत किराडिया, प्राची किराडिया, पूर्वी किराडिया व पियुष किराडिया या आपल्या चार मुलांना विहिरीत ढकलून स्वतः ही जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीतून पाचही जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून शवविच्छेदनासाठी जळगाव जामोद ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. याप्रकरणी, पुढील चौकशी जळगाव जामोद पोलीस करत आहेत.

## वेंगालील कृष्णन कृष्ण मेनन उर्फ व्ही. के. कृष्णमेनन

**काँग्रेस पक्षाचे नेते व भारताचे इंग्लंडमधील माजी राजदूत वेंगालील कृष्णन कृष्ण मेनन उर्फ व्ही के कृष्णमेनन यांचा जन्म. ३ मे १८९६ रोजी झाला.मराठी माणसांच्या दृष्टीने कृष्ण मेनन यांना महत्त्व आहे. पण मराठीच काय आपली मातृभाषा मल्याळमदेखील सफाईदारपणे बोलता न येणाऱ्या कृष्ण मेनन यांनी दोन वेळा (१९५७ आणि १९६२ साली) मुंबईतून लोकसभेची निवडणूक जिंकली.**



**पहिला** विजय तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दरम्यानचा होता. व्ही.के. कृष्ण मेनन हे काँग्रेस पक्षाचे नेते होते. ते १९४७ ते १९५२ या काळात भारताचे इंग्लंडमधील राजदूत होते. ते १९५३ मध्ये राज्यसभेवर निवडून गेले आणि ३ फेब्रुवारी १९५६ रोजी त्यांचा जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रीमंडळात बिनखात्याचे मंत्री म्हणून समावेश झाला. ते १९५७ मध्ये तत्कालीन मुंबई प्रांतातील उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताची काश्मीर प्रश्नावर बाजू मांडायला केलेले २३ जानेवारी १९५७ रोजी केलेले आठ तासांचे भाषण संयुक्त राष्ट्रांच्या इतिहासातील आजपर्यंत सर्वात जास्त चाललेले भाषण आहे. एप्रिल १९५८ मध्ये त्यांची भारताचे संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती झाली. १९६२ च्या चीनविरूध्दच्या युध्दात भारताच्या झालेल्या पराभवानंतर सर्वत्र होत असलेल्या टिकेमुळे त्यांना संरक्षणमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला. १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला. पण ते १९६९ मध्ये पश्चिम बंगाल राज्यातील मिदनापूर लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. तसेच १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत ते केरळ राज्यातील तिरूवनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. कृष्ण मेनन यांच्यावर जयराम रमेश यांनी ए चेकर्ड ब्रिलिएन्स : द मेनी लाईव्स ऑफ व्ही.के.कृष्ण मेनन हे पुस्तक लिहिले आहे.



व्ही.के.कृष्ण मेनन यांचे ६ ऑक्टोबर १९७४ रोजी निधन झाले.

## म्हाडाकडून डिजिटल प्रशासनाला गती

मुंबई

**महाराष्ट्र** शासनाच्या GPR २.० (Governance Performance and Reforms २.०) या प्रशासकीय सुधारणा उपक्रमांतर्गत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय विभागांचे सक्षमीकरण करून नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने म्हाडाकडून आज दोन महत्त्वपूर्ण डिजिटल सुविधांचे लोकार्पण करण्यात आले. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, यांच्या हस्ते "CFC Home' आणि "Visitor Management System' या नागरीकाभिमुख संगणकीय प्रणालींचे अनावरण करण्यात आले.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात आयोजित 'गो लाईव्ह' कार्यक्रमात नागरिकांसाठी अद्ययावत करण्यात आलेली "CFC केश' प्रणाली तसेच अधिकाऱ्यांच्या भेटीसाठी ऑनलाइन वेळ निश्चित करणारी अभ्यांगत व्यवस्थापन प्रणाली म्हणजेच "Visitor Management System' ही सुविधा आजपासून कार्यान्वित करण्यात आली. शासनाच्या GPR २.० धोरणानुसार पारंपरिक कार्यालयीन प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान करून त्या पूर्णपणे डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून देण्याच्या दिशेने म्हाडाने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## तुटवडा नसल्याचा दावा खोटा अंबादास दानवेंचा हल्लाबोल

छत्रपती संभाजीनगर

**राज्यात** गेल्या तीन-चार महिन्यांपासून ग्रामीण भागात डिझेलचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागत आहेत.असे असतानाही केंद्र आणि राज्य सरकार या परिस्थितीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहे, अशा शब्दात उबाठाचे नेते आ. अंबादास दानवे यांनी सरकारवर हल्लाबोल केला. येथे आयोजित पत्रकार परिषदेत दानवे बोलत होते. ते म्हणाले काळाबाजार करणाऱ्यांमुळे आज सर्वसामान्य शेतकऱ्यांना डिझेल मिळेनासे झाले आहे. मी स्वतः प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी तीन तास पेट्रोल पंपावर रांगेत उभा होतो.

## मालेगावात पाणीटंचाई! १६ गावे ४८ वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा

मालेगाव

**उन्हाळ्याच्या** तीव्रतेमुळे मालेगाव तालुक्यात पाणीटंचाई गंभीर झाली असून तालुक्यातील १६ गावे आणि ४८ वाड्या-वस्त्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या भागातील सुमारे ३७,१९५ लोकसंख्येला प्रशासनाकडून टँकरद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे.

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भारत बेदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाढत्या तापमानामुळे भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. अनेक गावांतील विहिरी, विंधन विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडल्याने पाणीपुरवठा योजनाही ठप्प झाल्या आहेत. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## रणवीर सिंगवर चित्रपट संघटनेकडून बंदी! 'डॉन ३' वादात

नवी दिल्ली

**अभिनेता** रणवीर सिंग याच्यावर 'डॉन ३' चित्रपटातून अचानक बाहेर पडल्याच्या वादानंतर फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज कडून बंदी घालण्यात आली आहे. फरहान अख्तरच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.


गेल्या आठवड्यात या प्रकरणाची संघटनेकडून दखल घेण्यात आली होती. त्यानंतर आज माध्यमांसमोर हा निर्णय जाहीर करण्यात आला. फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईजने रणवीर सिंगविरोधात 'नॉन-कोऑपरेशन' निर्देश जारी करत चित्रपटसृष्टीला त्यांच्यासोबत काम न करण्याचे आवाहन केले आहे.

### फरहान अख्तरची तक्रार

'डॉन ३' चित्रपटाच्या शूटिंगपूर्वी रणवीर सिंग यांनी अचानक चित्रपट सोडल्याच्या वृत्तानंतर हा वाद वाढला. हा चित्रपट फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांच्या एक्सेल एंटरटेनमेंट बॅनरअंतर्गत तयार होत आहे.

फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज चे मुख्य सल्लागार अशोक पंडित यांनी या प्रकरणाला गंभीर म्हटले असून, शूटिंग सुरू होण्याच्या काही दिवस आधी कलाकारांनी चित्रपट सोडण्याच्या प्रवृत्तीवर टीका केली. शूटिंग सुरू होण्याच्या दहा दिवस आधी प्रकल्पातून माघार घेणे चुकीचे आहे. उद्योगाच्या हितासाठी योग्य निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी म्हटले.

# नवाकाळ शब्दकोडे–१६१७



**आडवे शब्द –**

२. बाडबिस्तारा ४. संकट ६. नट १०. पर्वत १२. किरकोळ, लहानसे १३. अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू १५. गणपतीचा प्रसाद १७. पहाटेची आरती २०. वडाचे झाड २२. अष्टविनायकांपैकी चिंतामणी येथे आहे २४. ओसरी २५. हनुमान २७. बारा राशींपैकी दहावी २८. ऊन-पावसापासून रक्षण करणारी २९. पत्त्यांचा जुगारात रूपांतर होणारा एक खेळ ३१. उष्णतेमुळे होणारी अंगाची लाही ३३. अलगूज, पावा ३६. मुकुट ३८. रंगवून केलेले वर्णन ४१. प्रसिद्ध म्हण-'असतील शिते, तर ×××× ××' ४३. हलणारे ४५. अर्भकाच्या डोक्यावरचे केस ४८. गुलामी ४९. शुद्ध, परम ५०. पाण्यात राहणारे प्राणी ५३. आप्त ५५. बाण ५६. झाड ५८. जावयाचा तिरकस उल्लेख ६०. गिरणीतून आलेले अखंड कापड ६१. एकी ६३. कुशल ६५. कुबेराचा सेवक ६६. मिठी ६८. उणेपण, वैगुण्य ६९. कावळ्याचे ओरडणे ७०. तोटा ७२. वर्ष ७४. पाषाण ७५. तृतीया ७६. महाराणा प्रतापचा प्रसिद्ध घोडा ७७. एक लक्ष ७९. नलिका ८१. सुखरूप ८५. सूर्योदयानंतरचा प्रहर ८६. 'जळामध्ये मासा झोप घेई कैसा, ×× ×× ×× ×× ××' ८८. गुण ओळखण्याची क्षमता ८९. शिशिर ऋतूमध्ये झाडांची पाने गळून जाण्याचा प्रकार ९०. दहशत ९१. प्रयत्न, थरथर ९३. विनोबांचा आश्रम ९६. सरावाने कुशल झालेला ९८. व्यवस्थित ९९. बोकड १००. जसा १०१. पुच्छ १०२. चुकीचा, अपेक्षित नसलेला १०३. नम्र १०४. पश्चात्ताप १०५. स्वर

**उभे शब्द –**

१. निर्नायकी स्थिती, सावळा गोंधळ ३. तळतळाट ४. भव्य ५. डिंक ७. फालतू ८. प्रामाणिक ९. ऊन-पावसापासून रक्षण करणारे, तंबूसाठी वापरले जाणारे कापड १०. तानाजी मालुसरे यांची मरणोत्तर उपाधी ११. वेग १४. छाया १५. जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका १६. हरिदास १८. विहीर १९. डोंगर फोडून केलेला रस्ता २१. स्वभाव २३. छाती २६. पालवी, हंगाम २७. चामखीळ ३०. लवण ३२. ढोंग ३३. गोष्ट, विषय ३४. बर्फ ३५. वखवखलेला ३६. किल्ल्याचा प्रभारी ३७. सोन्याच्या शुद्धतेचा अंश ३९. मोकळीक, किमतीवर दिलेली सूट ४०. प्रथा, प्रघात ४१. पाणी ४२. प्रखर ४४. गाण्याची तान ४५. छळ ४६. गणपती ४७. रेल्वे ५१. साध्य ५२. देखत ५३. उगीच, विनाकारण ५४. वेल ५५. संभवनीय ५७. देखणी स्त्री ५९. निद्रा, निजणे ६१. चैन ६२. बेशुद्धी ६४. स्वयंचलित वाहन थांबवण्याचे साधन ६७. अधीन ६८. दूध काढणे ६९. सायंकाळची हुरहूर लावणारी वेळ ७१. मंगलाष्टके चालू असताना वधूवरात असलेला पडदा ७३. कलेची निर्मिती करणारा ७८. उथळ पाण्याला ××××× ×× ८०. पंचाईत, अडचण ८१. तेजःपुंज ८२. पृथ्वीच्या पोटातील तप्त रस ८३. दफन झाल्यावर त्याच जागी उभारलेले स्मारक ८४. तलाव ८५. अजिबात खाचखळगे किंवा उंचवटे नसलेली जागा ८६. सावधगिरी ८७. फसवणूक ८९. बंध ९१. वाईट सवय ९२. पादचारी मार्ग ९४. भडिमार ९५. जनता ९७. देव ९९. शक्ती •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. किंतु ४. पकड ६. कपाळ ८. एकोपा ११. अनुज्ञा १२. सवा १४. सर १६. नालस्ती १७. हिडीसफिडीस करणे २१. लकडा २२. रसिक २४. दास २५. कटी २६. चाप २८. कफनी ३१. बनावट ३४. फिट्टंफाट ३६. बंडलबाज ३८. कर ३९. बाकी ४०. खंक ४१. नवकवी ४४. ईडलिंबू ४५. आजार ४६. तन ४७. मार ४८. रसातळ ५०. लवकर ५२. चाक ५३. रण ५४. श्रीफळ ५५. अंबारी ५६. सडा ५७. विपरीत ५९. भाट ६०. गजल ६१. नन ६२. कोळी ६३. काया ६४. पतकर ६६. अवनी ६७. दशा ६८. जड ६९. जाहीर ७०. वादातीत ७२. वार ७३. नीलगाय ७४. कठोर ७७. नव ७८. पारावार ७९. अल्याड ८०. कण ८१. अट ८३. साद ८६. रक्त ८७. अष्टवसु ८९. मळभ ९१. लवलेश ९३. रापण ९५. नवमी ९६. मार्दव ९७. गरीब ९८. नाक ९९. हर १०१. सारे १०२. समर १०४. दमा १०५. जनावर १०६. कंडू १०७. पारद १०८. मलूल

**उभे शब्द** : १. सानुनासिक ३. तुसडी ५. कवडी ६. कसर ७. पारणे ९. कोनाडा १०. पाल १३. वास १५. उलटी १८. फिदा १९. सदा २०. कसब २३. कफल्लक २५. कट २६. चाफा खंत करी काही केल्या फुलेना २७. पटकन २९. सडपातळ ३०. रुबाई ३२. नाकबूल ३३. वर ३४. फिकीर ३५. म्यानमार ३७. जडजंबाल ३९. बाजार ४२. वरणभात ४३. वीरश्री ४५. आकडा ४९. साफल्य ५१. वसन ५२. चाप ५५. अंजनी ५७. विळी ५८. तयार ५९. टक ६०. गवत ६१. नशा ६२. कोडगा ६४. पलक ६५. रवा ६६. अतीव ६७. दरवाजा ६८. जलद ७१. दानत ७२. वारा ७५. ठोक ७६. रणरण ७८. पाटव ८१. अष्टमी ८२. वेळ ८४. दलबदलू ८५. वराह ८७. अवज्ञा ८८. सुमारे ८९. मवसर ९०. भगर ९२. शककर्ता ९४. परज १००. देव १०१. साडू १०३. मद १०४अ. माल

## पेट्रोल-डिझेल दरांत दहा दिवसांत चौथ्यांदा वाढ
## सामान्यांवर संकट ! तेल कंपन्यांचा १३० टक्के नफा

पान १ वरून तेल कंपन्यांनी २०२५-२६ मध्ये एकूण ७७,२८०.६५ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. ही मागील वर्षाच्या तुलनेत १३० टक्के वाढ आहे. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान, जेव्हा इस्त्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे जग संकटात होते, तेव्हादेखील या कंपन्यांनी १९,४७० कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. ही मागील वर्षाच्या तुलनेत ४० टक्क्यांची वाढ आहे. कंपन्या इतका नफा कमावत असताना, दररोज गुपचूप किमती का वाढवल्या जात आहेत?

काँग्रेसचे महाराष्ट्रातील नेते विजय वडेट्टीवार यांनी मोदींच्या धोरणामुळे देशात कोरोना काळापेक्षा वीसपट वाईट परिस्थिती निर्माण होणार असल्याचा दावा केला. ते म्हणाले की, सध्याची इंधन टंचाई कृत्रिम नाही. काल अमेरिकेने असा फतवा काढला आहे की, भारताने इराण व रशियाकडून तेल खरेदी करू नये. अमेरिकेचे तेल कितीही महाग असले तरी तेच तेल भारताने खरेदी केले पाहिजे. त्यामुळे ही टंचाई कृत्रिम नाही. ती निर्माण होण्यास सरकार जबाबदार आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे पेट्रोल - डिझेल मिळत नाही. ब्रेंट क्रूड आंतरराष्ट्रीय बाजारात १०० डॉलर्सच्या खाली घसरले आहे. कच्चे तेल स्वस्त झाले आहे. पण भारतात मात्र पेट्रोल-डिझेलचे दर गगनाला भिडत आहेत. हा थेट सामान्य माणसाच्या खिशावर टाकलेला दरोडा नाही तर काय?

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पेट्रोल-डिझेल दरवाढीचे मुळीच आश्चर्य वाटत नाही, असे सांगत प्रतिक्रिया दिली की, युद्ध सुरू झाल्यापासून राहुल गांधींसह इंडिया आघाडीचे सर्व नेते सरकारला वारंवार इशारे देत होते.

हे राष्ट्रीय संकट आहे. सर्वांनी एकजुटीने त्याचा सामना केला पाहिजे. मात्र सरकारला आमचे ऐकायची इच्छाच नाही. मोदींसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लोकांची सातत्याने दिशाभूल करत आहेत. गेल्या आठवड्यात फडणवीस एकीकडे लोकांना सांगत होते की आपल्याकडे आवश्यक तेवढा पेट्रोल - डिझेलचा साठा आहे. काळजी करण्याची काहीच गरज नाही. तर दुसरीकडे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ सांगत होते की केवळ एक महिना पुरेल एवढाच साठा शिल्लक आहे. ही शुद्ध बनवाबनवी आहे. सरकार या इंधन संकटावर कधी खरे बोलणार?

शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनीदेखील पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीवरून केंद्र सरकारवर टीका करताना इशाराच दिला की, आणखी काही दिवसांत पेट्रोल-डिझेलमध्ये ३० ते ४० रुपयांची वाढ होईल.पेट्रोल पंपांवर दंगली होतील.

## नीट सुनावणी! एनटीएवर ताशेरे! मागील पेपरफुटीनंतर सुधारणा नाही

पान १ वरून

प्रकरणाशी संबंधित सर्व याचिका एकत्र करून सुनावणी करण्याचाही निर्णय घेतला आहे आजच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने एनटीए आणि संबंधित अधिकाऱ्यांना तपास यंत्रणा आणि सुधारणा समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. सर्व याचिकांची प्रत सॉलिसिटर जनरल यांना देण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता तन्वी दुबे यांनी या प्रकरणाची तातडीने सुनावणी घ्यावी, अशी मागणी केली. मात्र न्यायालयाने केवळ तातडीपुरते न पाहता पूर्वी दिलेल्या सुधारणा सूचनांची अंमलबजावणी झाली आहे का, यावरही प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाने म्हटले की, आम्ही एक समिती स्थापन केली होती. तसेच एनटीएला १४ नोव्हेंबर रोजी स्थापन केलेल्या देखरेख समितीच्या कामकाजाची माहिती तीन दिवसांत सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. या प्रकरणाची पुढील सुनावणी प्रतिज्ञापत्र सादर झाल्यानंतर होणार असून, सुधारणा उपाययोजनांची अंमलबजावणी झाली आहे की नाही, यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने अटक केलेल्या मनीषा हवालदार हिला आज दिल्ली येथील सीबीआय कोर्टापुढे हजर केले असता तिला ६ दिवसांची सीबीआय कोठडीत ठेवण्याचे आदेश कोर्टाने दिले. एनटीए पॅनेलवरील 'फिजिक्स'ची प्राध्यापिका मनीषा हवालदार हिच्या चौकशीतून अनेक धक्कादायक गुपिते उघड झाली आहेत. मनीषा हवालदारच्या पतीच्या मोबाईलमध्ये 'गॉड' नावाने सेव्ह असलेला संशयास्पद क्रमांक एका विद्यार्थ्याचा असल्याची माहिती सीबीआयच्या फॉरेन्सिक तपासात समोर आली असून, यातून पेपरफुटीचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.

मनीषा हवालदारने तपास यंत्रणांच्या हाती काही लागू नये म्हणून कमालीची सावधगिरी बाळगली होती. तिने स्वतः तयार केलेल्या भौतिकशास्त्राच्या प्रश्नांच्या हस्तलिखित नोट्स जाळून नष्ट केल्या. तसेच, सहआरोपी आणि जीवशास्त्राची प्राध्यापिका मनीषा मांढरे हिच्यासोबत केलेले सर्व व्हॉट्सअॅप चॅट आणि मेसेज डिलीट करून डिजिटल पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

विशेष म्हणजे, प्रश्नमालिका पाठवण्यासाठी तिने स्वतःच्या फोनसह पतीच्या मोबाईलचाही वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. २२ मे रोजी सदाशिव पेठेतील मनीषा हवालदारच्या निवासस्थानी टाकलेल्या छाप्यात सीबीआयला लॅपटॉप, हार्ड डिस्क आणि नीट प्रश्नपत्रिकेच्या प्रतींसह १ लाख १ हजार ९३० रुपयांची रोकड हस्तगत केली आहे. काही विद्यार्थ्यांना प्रश्न पुरवण्याच्या बदल्यात तिने ही मोठी रक्कम स्वीकारल्याची कबुली दिल्याचे समजते.

**फॉर्म जी चे शुध्दिपत्रक**
**स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण**
**एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड**
**(आयबीबीआय (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए चे उप-नियम (१) अन्वये)**

हे शुद्धिपत्रक, एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड (सीआयएन: एल७४९९९डीएल१९९४पीएलसी०६१३५३) ('कॉर्पोरेट कर्जदार') चे रिझोल्यूशन प्रोफेशनल या नात्याने अधोस्वाक्षरीदाराने दिनांक ०४.०५.२०२६ रोजी प्रकाशित केलेल्या फॉर्म जी ('मूळ फॉर्म जी') च्या संदर्भात निर्गमित केले जात आहे, ज्याद्वारे कॉर्पोरेट कर्जदारासाठी रिझोल्यूशन प्लॅन सादर करण्याकरिता, पात्र व संभाव्य ठराव अर्जदारांकडून स्वारस्य अभिव्यक्ती ('ईओआय') आमंत्रित करण्यात आली होती.

कॉर्पोरेट कर्जदाराच्या धनकोंच्या समितीच्या ('सीओसी') मंजुरीनुसार, तसेच सर्व पात्र संभाव्य ठराव अर्जदारांना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या आणि नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या उद्दिष्टांशी सुसंगत राहून कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तेचे मूल्य जास्तीत जास्त वाढवण्याच्या उद्देशाने, मूळ फॉर्म जी मध्ये नमूद केलेल्या खालील कालमर्यादांमध्ये याद्वारे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:

| अ. क्र. | तपशिल | मूळ दिनांक (दिनांक ०४.०५.२०२६ च्या फॉर्म जी नुसार) | सुधारित दिनांक (या शुद्धीपत्रकानुसार) |
|---|---|---|---|
| १ | स्वारस्य अभिव्यक्ती आणि इसारा रक्कम स्वीकारण्याची शेवटची तारीख | २५ मे २०२६ (१८:०० वा. भाप्रवे) | ०४ जून २०२६ (२३:५९ वा. भाप्रवे) |
| २ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | ०४ जून २०२६ | १४ जून २०२६ |
| ३ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ०९ जून २०२६ | १९ जून २०२६ |
| ४ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | १४ जून २०२६ | २४ जून २०२६ |
| ५ | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | २० जून २०२६ | १ जुलै २०२६ |
| ६ | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | २० जुलै २०२६ | ३१ जुलै २०२६ |

दिनांक ०४.०५.२०२६ रोजीच्या मूळ फॉर्म जी मध्ये नमूद केलेले आणि त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या स्वारस्य अभिव्यक्तीसाठीचे आमंत्रण या सविस्तर दस्तऐवजातील इतर सर्व अटी, शर्ती, पात्रता निकष आणि तपशील हे अपरिवर्तित राहतील आणि पूर्णपणे अंमलात व प्रभावात राहतील.

मूळ फॉर्म जी ला प्रतिसाद म्हणून ज्या इच्छुक पक्षांनी आपली ईओआय यापूर्वीच सादर केली आहे/ जे ती सादर करण्याच्या प्रक्रियेत आहेत, त्यांना ती पुन्हा सादर करण्याची आवश्यकता नाही; तथापि, त्यांची इच्छा असल्यास, सुधारित अंतिम मुदतीपर्यंत किंवा त्यापूर्वी ते आपल्या ईओआय मध्ये पूरक माहिती जोडू शकतात अथवा ती अद्ययावत करू शकतात.

इच्छुक पक्ष, पात्रता निकष, ईओआय सादर करण्याचे नमुने, गोपनीयता हमीपत्र आणि प्रक्रियेसंबंधी इतर कागदपत्रांचा समावेश असलेला सविस्तर स्वारस्य अभिव्यक्तीसाठीचे आमंत्रण हा दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी, रिझोल्यूशन प्रोफेशनल यांना cirp.educomp@awarensic.com या पत्त्यावर लिहू शकतात.

सही/-
**सीए कमल कुमार जाडवाणी**
**एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड करिता रिझोल्यूशन प्रोफेशनल**
**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPA-001/IP-P-02786/2022-2023/14259
**एएफए वैधता:** ३०.०६.२०२६ पर्यंत
आयबीबीआय नोंदणीकृत पत्ता: ऑफिस १०, सेंटर पॉइंट, १ ला मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१ इमारत, कफ परेड, मुंबई – ४००००५
ई-मेल: cirp.educomp@awarensic.com । दूरध्वनी: +९१-७०४५५ ९४०३९
**दिनांक: २६ मे २०२६**
**ठिकाण: नवी दिल्ली / मुंबई**

## गिरणी कामगारांना घरे देण्याचे सरकारचे धोरण अनाकलनीय

पान ८ वरून

असे वाटत होते. त्याबद्दल संघटनेने आभार मानले होते, असेही मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. याचबरोबर शेलू प्रकल्पाला साधारण ४ ते ५ हजार गिरणी कामगारांनी भेट देवून प्रकल्पास समंती दिली आहे. गिरणी कामगार ही घरे स्वीकारण्याच्या मनस्थितीत असताना आता सरकारने समिती गठित करून गिरणी कामगारांकरिता मुंबईत घरे देता येतील का याचा शोध घेण्यास सांगितले आहे. ही गिरणी कामगारांची कुचेष्टा नाही का?, असा प्रश्न आहे. त्यामुळे गिरणी कामगार संभ्रमात पडले आहेत.

मुंबईत घरे मिळणार असतील तर कुणीही मुंबईबाहेर घर स्वीकारणार नाहीत, अशी कामगारांची भूमिका असणे गैर नाही. कामगारांचा संभ्रम टाळण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या समितीने १५ दिवसांत अहवाल उघड करून मुंबईत कुठे व किती घरे देणार आहेत ते स्पष्ट करावे. यापूर्वी गेली १० वर्षे सरकार मुंबईत घरे देता येतील का, त्याचा अहवाल संबंधित शासकीय संस्थांना तयार करण्यास सांगत आहे. प्रत्येक बैठकीत हाच आदेश दिला जातो. पण आजवर एकही अहवाल उघड झाला नाही. आता समिती नेमून तोच खेळ सुरू आहे, असा आरोप संघटनेने केला आहे.

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येते की, गोकुळ अपार्टमेंट्स, केवाणी पाडा, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई - ४००१०२ येथे स्थित गोकुळ ग्राम को-ऑप.हौ.सो. लि. सोसायटीचे मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ०१५ (०५ शेअर्स करिता विशिष्ट क्र.७१ ते ७५) हे (फ्लॅट क्र.बी-२०४ चे धारक) **सौ. विमला कल्याणजी देढिया आणि श्री.कल्याणजी रतनशी देढिया** यांच्या नावाने जारी करण्यात आलेले असून ते हरवले / गहाळ झाले आहे. संबंधित सभासदांनी दुय्यम भाग प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

सदर दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्यास कोणत्याही व्यक्तीस काही दावा किंवा हरकत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह आपला दावा / हरकत खाली सही करणाऱ्याकडे सादर करावी.

**सही/- सचिव / अध्यक्ष**
**गोकुळ ग्राम को-ऑप.हौ.सो.लि.**
ठिकाण: मुंबई दिनांक : २६.०५.२०२६

## सावरकर बदनामी प्रकरणी माध्यम कंपन्यांच्या अटक वॉरंटची मागणी

■ पुणे

**पुण्यात** सुरू असलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर बदनामी प्रकरणात त्यांच्या नातू सात्यकी सावरकर यांनी माध्यम कंपन्या समाजमाध्यमे व वृत्तपत्राविरोधात अटक वॉरंट जारी करण्याची मागणी न्यायालयात केली. न्यायालयाने मागवलेली कागदपत्रे आणि माहिती वेळेत सादर न केल्याचा आरोप करत हा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मार्च २०२३ मध्ये लंडन येथे अनिवासी भारतीयांसमोर भाषण करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत बदनामीकारक वक्तव्य केले होते. या वक्तव्याविरोधात सात्यकी सावरकर यांनी पुण्यातील एमपी-एमएलए विशेष न्यायालयात मानहानीचा दावा दाखल केला आहे.

## पूर्व विदर्भात काँग्रेसला मोठे खिंडार

पान १ वरून

यामध्ये समावेश आहे. त्यामुळे काँग्रेसला मोठे खिंडार पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पक्षात अस्वस्थता पसरली असून, नेत्यांची धावपळ सुरू झाली आहे. दरम्यान, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी भाजपाने प्रत्येकी पंधरा लाख रुपये देऊन नगरसेवक पळवले असून, या निवडणुकीत भाजपा शंभर कोटी रुपये खर्च करणार आहे, असा दावा केला आहे. एकेका मतासाठी १५-१५ लाख रुपये वाटण्यात येत असतील तर भविष्यात लोकशाही जिवंत राहील कशी, असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

## कलाकार विजय पाटकरांना सामंतांच्या पत्नीसाठी धमक्या?

पान १ वरून- ठाण मांडून बसला असून, कोण उमेदवार असावा किंवा नसावा यासाठी दबाव टाकला जात आहे. आम्ही गेली ४० वर्षे या इंडस्ट्रीत काम करतो, आम्ही कधी राजकारण्यांकडे जात नाही. मग त्यांनी आमच्या क्षेत्रात हस्तक्षेप का करावा?

पुढे विद्यमान अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्यावर आरोप करताना पाटकर म्हणाले की, माझा आक्षेप मेघराज राजेभोसलेवर आहे. त्याला लाज वाटायला पाहिजे. मागील १० वर्षे काय केले? महामंडळाच अक्षरशः थडगे केले. याने ७ महिने कर्मचाऱ्यांचा पगारदेखील दिला नाही. उलट मला फोन करतो आणि म्हणतो, माझ्या पॅनलमधून उभे रहा. याला लाज कशी वाटत नाही? मी काय माती खाल्ली आहे याच्या पॅनलमधून उभे राहायला? मी माझा फॉर्म भरून पाठवला, पण दुपारी वेळ संपली तेव्हा मला कळले की माझा फॉर्म भरला नाही. मी त्यांना विचारले तर ते म्हणाले की आम्हाला सांगण्यात आले की थोडे थांबा, दुसऱ्याचे पॅनल उभे राहू द्यायचे नाही असे राजकारण सुरू आहे. बाहेरचे राजकारण बघवत नाही, ऐकवतही नाही. तेच राजकारण चित्रपट महामंडळात आले आहे. अभिनेते विजय पाटकरांच्या आरोपांवर प्रत्युत्तर देताना मेघराज राजेभोसले यांनी म्हटले की, विजय पाटकर हा इंडस्ट्रीतला कलंक, अभिनयामध्ये कच्चा आहे, पण लबाडीमध्ये एक नंबर आहे. चार दिवसांत ६० जणांनी फॉर्म भरला आहे. ४० विरोधी पक्षातील लोकांनी अर्ज भरला. कुठला मंत्री आणि कुठला ओएसडी होता, ज्याने तुला फॉर्म भरू दिला नाही? त्याचे नाव जाहीर करावे.

या प्रकरणावरून ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीमध्ये नीलम उदय सामंत यांची निवड व्हावी यासाठी संपूर्ण सरकारी यंत्रणा कामाला लागली. विजय पाटकर यांच्यासारख्या अत्यंत ज्येष्ठ अभिनेत्यालासुद्धा अर्ज भरण्यापासून रोखण्यात आल्याची माहिती मिळत आहे, जे अतिशय गंभीर आहे. नेते अभिनेत्यांसारखे वावरतात तिथपर्यंत ठीक आहे. पण नेते अभिनेत्यांचे हक्काचे कलाक्षेत्रही बळकावत असतील, तर दुर्दैवी आहे.

**TENDER NOTICE**
**NEW SAI ASHIRWAD CHSL**
Situated At Shanti Park, Nalasopara (W), Thane-401203
Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.
Tender can be collected from Consultant Office
From: **26/05/2026 to 03/06/2026**
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission on **05/06/2026**
(from 11:00 am to 6:00 pm.)
At NEW SAI ASHIRWAD CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted
STAR ASSOCIATES PMC PVT. LTD.
Consulting Engineers
Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East)
Tel. Office. 98208 18155
**Tender Cost Rs. 3,000/- (Non-Refundable)**

**जाहिर नोटिस**

सर्व संबंधितांना हयाद्वारे कळविण्यांत येते की, गोविंद सिंग जगजित सिंग भाब्रा व त्याचे सहकारी श्रीराज कंन्ट्रक्शन चे डायरेक्टर धनराज जावळे हे गावः हरियाली, विक्रोली, टागोर नगर, सर्वे नं. ३६, सर्वे नं. ४२, न.भू.क्र. २५०, २५१ (पार्ट) और न.भू.क्र. २८६ (पार्ट), २८९, २९० या मिळकतीमध्ये एकत्रित रित्या भूखंड विकसित करणे बाबत विचाराधिन आहे. याबाबत वरील नमुद दोन्ही पक्षकारांमध्ये आपआपसांत तोंडी समजोता झालेला असून भूखंड विकसित करण्यापूर्वी या भूखंडावरती त्रयस्थ व्यक्ती, अथवा अन्य व्यक्ती ज्यांचा या भूखंडामध्ये हितसंबंध आहे, व हितसंबंधाबाबत त्यांच्याकडे कायदेशीर कागदोपत्री पुरावे उपलब्ध आहे अश्या त्रयस्थ व्यक्ती व अन्य व्यक्ती यांच्या हरकती खालील नमुद पत्त्यावरती कागदोपत्री पुराव्यासह त्यांनी स्वतःचे अधिकार हितसंबंध दाखल करावेत, जे समजंसपणे विचारविनीमय करून आवश्यकतेनुसार कायदेशीर बाबी पडताळून अथवा गरज भासल्यास कायदेशीर दाद मागता येऊ शकेल, याबाबत निर्णय घेण्यास भूखंड विकसित करणेकामी योग्य व सर्वांचे हिताचे असणार आहे. त्यामुळे सदरची जाहिर नोटिस तमाम जनतेस ज्ञात व्हावी, याकरिता देण्यात येत आहे. सदर कागदोपत्री पुराव्यासह हरकतीचा कालावधी जाहिर केलेल्या तारखेपासून १४ दिवसांचे आत दयावी, खालील नमुद पत्त्यावरती.

हरकत पाठविणे बाबतचा पत्ताः
गोविंद सिंग जगजित सिंग भाब्रा व त्याचे सहकारी श्रीराज कंन्ट्रक्शन चे डायरेक्टर धनराज जावळे
पत्ता: श्री. गोविंद सिंग जगजित सिंग भाब्रा
पाटील रेशन शॉप जवळ, ओल्ड बॅरेक, १/९ जवळ, गणेश पाडा, मुलुंड कॉलनी, मुंबई ४०००८२
मोबाईल नंबरः ९१६७४४८८३९/९३७०५२८७२९
दिनांकः २६/०५/२०२६

**जाहिर सूचना**

सार्वजनिक सूचना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मी माझ्या पक्षकाराच्या वतीने श्रीमती नयना नवीन व्यास उर्फ नयना नवीनचंद्र व्यास (यापुढे **"मालक"** म्हणून उल्लेखित) यांच्या मालकी हक्काची चौकशी करत आहे. सदर चौकशी फ्लॅट क्र. ४०१, क्षेत्रफळ अंदाजे ६४० चौरस फूट कार्पेट एरिया, चौथा मजला, एच विंग, महालक्ष्मी टॉवर, द न्यू डी. एन. नगर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीज युनियन लि., न्यू डी. एन. नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३, तसेच महालक्ष्मी टॉवरच्या तळमजला २ (बेसमेंट २) येथील एच-४०१ क्रमांकाच्या कार पार्किंग जागेवरील हक्क आणि खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या शेअर्सच्या संदर्भात आहे.

माझे पक्षकार, उपरोक्त फ्लॅटच्या संदर्भातील मालकाचे सर्व हक्क, अधिकार आणि हितसंबंध, तसेच उपरोक्त कार पार्किंग जागेचा हक्क आणि खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेले शेअर्स खरेदी करू इच्छित आहेत.

जर कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा, खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या सदर फ्लॅट, सदर कार पार्किंग जागा आणि सदर शेअर्सवर विक्री, बोजा, गहाण, अदलाबदल, भेट, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, वारसा हक्क, मृत्युपत्रानुसार दिलेली संमती आणि परवानगी, सुखाधिकार, वारसदार किंवा कोणत्याही कराराअंतर्गत किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा हितसंबंध असेल, तर त्यांनी तसे मला माझ्या कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी कळवावे : परिसर क्र. १८, पहिला मजला, "ई" इमारत, खिरानगर, एस.व्ही. रोड, सांताक्रूझ (पश्चिम) मुंबई-४०००५४, येथे अशा दाव्यांचा किंवा हितसंबंध असल्यास ते कागदोपत्री पुराव्यांसह, सदर सार्वजनिक सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सादर करावा, अन्यथा असे गृहीत धरले जाईल की मालक सदर फ्लॅट, सदर कार पार्किंगची जागा आणि खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या हिश्श्यांवर पूर्णपणे हक्कदार आहे आणि ते सर्व प्रकारच्या बोजा आणि शुल्कांपासून मुक्त आहेत आणि त्यासंबंधी मालकी हक्काची चौकशी आणि व्यवहाराचे प्रकरण माझ्या पक्षकाराद्वारे अशा कोणत्याही दाव्यांचा (असल्यास) कोणताही संदर्भ न घेता पूर्ण केले जाईल आणि ते दावे सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

**वर संदर्भित अनुसूची:**

**फ्लॅटचे वर्णन:**

फ्लॅट क्र. ४०१, मोजमापित ६४० चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळ किंवा त्याआसपास, ४ था मजला, एच विंग, न्यू डी. एन. नगर सहकारी गृहनिर्माण संस्था संघ लि. च्या लेआउटमधील महालक्ष्मी टॉवर, गाव व तालुका अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५३ येथील सीटीएस क्र. १९५ (भाग) येथे स्थित, सोबत महालक्ष्मी टॉवरच्या बेसमेंट २ येथील एच-४०१ क्रमांकाच्या कार पार्किंग जागेचा हक्क.

**शेअर्सचे वर्णन:**


उपरोक्त फ्लॅटच्या संदर्भात न्यू डी. एन. नगर सहकारी गृहनिर्माण संस्था संघ लि. द्वारे जारी केलेल्या शेअर प्रमाणपत्र क्र. ४३१ अंतर्गत, प्रत्येकी रु. ५०/- (पन्नास रुपये) दर्शनी मूल्याचे, ४३०१ ते ४३१० (दोन्ही समाविष्ट) असे विशिष्ट क्रमांक असलेले १० (दहा) पूर्ण भरणा झालेले शेअर्स.

**दिनांक: २६ मे, २०२६.**

सही/-
**पयोजा ए. गांधी,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय**

नवा काळ
पुणे । मंगळवार २६ मे, २०२६ • पान -८

# डोनाल्ड ट्रम्प यांची वैद्यकीय चाचणी होणार



**वॉशिंग्टन** - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे लवकरच त्यांची वैद्यकीय चाचणी करण्यात येणार आहे. वॉल्टर रीड नॅशनल मिलिटरी मेडिकल सेंटरमध्ये ट्रम्प यांची वैद्यकीय चाचणी होणार आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची दुसऱ्यांदा सुत्रे हाती घेतल्यापासून ट्रम्प यांची ही चौथी वैद्यकीय चाचणी आहे. व्हाईट हाऊसने याबाबत माहिती दिली आहे. दरवर्षी करण्यात येणारी ही एक नियमित वैद्यकीय चाचणी आहे, असे व्हाईट हाऊसने निवेदनात म्हटले आहे.

मानावा की मानू नये
या भानगडीत मी पडत नाही,
आपल्या मान्यतेवाचून
देवाचं काही अडत नाही..!

ज्यांना देव हवा आहे
त्यांच्यासाठी तो श्वास आहे,
ज्यांना देव नको आहे
त्यांच्यासाठी तो भास आहे,
आस्तिक नास्तिक वादात
मी कधीच पडत नाही,
आपल्या मान्यतेवाचून
देवाचं काही अडत नाही..!

हार घेऊन रांगेत कधी
मी उभा राहत नाही,
पाव किलो पेढ्याची लाच
मी देवाला कधी देत नाही,
जो देतो भरभरून जगाला
त्याला मी कधी देत नाही,
आपल्या मान्यतेवाचून
देवाचं काही अडत नाही..!

जे होणारच आहे
ते कधी टळत नाही,
खाटल्यावर बसून
कोणताच हरी पावत नाही,
म्हणून मी कधी
देवास वेठीस धरीत नाही,
आपल्या मान्यतेवाचून
देवाचं काही अडत नाही..!

देव देवळात कधीच नसतो...
तो शेतात राबत असतो,
तो सीमेवर लढत असतो,
तो कधी आनंदवनात असतो,
कधी हेमलकसात असतो,
देव शाळेत शिकवत असतो,
तो अंगणवाडीत बागडत असतो,
तो इस्पितळात शुश्रूषा करीत असतो,
म्हणून...
ह्यांच्यातला देव मी कधी नाकारत नाही,

आपल्या मान्यतेवाचून
देवाचं काही अडत नाही..!

-कुसुमाग्रज

# गिरणी कामगारांना घरे देण्याचे सरकारचे धोरण अनाकलनीय

**गिरणी कामगार कृती संघटनेचा आरोप**

मुंबई

**राज्य** सरकारचे गिरणी कामगारांना घरे देण्याचे धोरण अनाकलनीय असल्याचा आरोप गिरणी कामगार कृती संघटनेने मुंबईत नुकत्याच झालेल्या बैठकीत केला. परेल येथील गिरणी कामगार संघर्ष समितीच्या कार्यालयात कृती संघटनेची कार्यकर्त्यांसमवेत याविषयी बैठकीत चर्चा झाली. या बैठकीस प्रविण घाग, जयश्री खाडिलकर, नंदू पारकर, जयप्रकाश भिलारे, प्रवीण येरूणकर, जितेंद्र राणे, बबन गावडे आदी उपस्थित होते.

आजपर्यंत या सरकारने एकही घर बांधले नाही. तेव्हा सरकार घरे देण्यास ठोस निर्णय घेत नाही, असा मुद्दा या बैठकी पुढे आला. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख सरकारने २००३ ला डीसीआरमध्ये केलेल्या बदलामुळे १०० एकर जागेऐवजी २३ ते २४ एकर जागा गिरणी कामगारांच्या वाट्याला आली आणि सर्वोच्च न्यायालयानेदेखील त्याला मान्यता दिली. या सुधारित डीसीआरमुळे गिरण्यांच्या जागेवर २३ ते २४ हजार घराव्यतिरिक्त आणखीन घरे होऊ शकत नाही ही बाब लक्षात घेऊन गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी सरकारने पनवेल, कोणगांव येथे २४१७ घरांचा प्रस्ताव दिला व त्याप्रमाणे २ डिसेंबर २०१६ ला घरांची सोडत काढली. तसेच भिवंडी रोड, पळस्पे नाका, कल्याण-शीळ फाटा येथे २५२१ घरांना मान्यता दिली. ती सोडत प्रलंबित आहे. त्यानंतर सरकारने एमएमआरडीए परिसरात शेलू येथे जागा निश्चित करून दोन दिवसांपूर्वी गिरणी कामगारांकरिता घरे बांधण्याकरिता विकासकाला कामाचे आदेश दिले. तेव्हा सरकार गिरणी कामगारांना घर मिळावे म्हणून प्रयत्नशील आहे, » पान ७ वर

# तामिळनाडूत अण्णाद्रमुकच्या ३ आमदारांनी राजीनामा दिला

चेन्नई

**तामिळनाडूत** अण्णाद्रमुकमधून फुटून वेगळ्या झालेल्या २२ बंडखोर आमदारांपैकी तीन आमदारांनी आज राजीनामा देऊन थेट मुख्यमंत्री विजय यांच्या टीव्हीके पक्षात प्रवेश केला.

मधुरंतकमचे मरगथम कुमारेसन, धारापुरमचे सत्यभामा व पेरुंदुरईचे जयकुमार या ३ नेत्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. विजय यांच्या टीव्हीके पक्षाने निवडणुकीत १०८ जागा जिंकल्या. मात्र मुख्यमंत्री विजय २ मतदारसंघातून विजयी झाल्याने त्यांना एका मतदारसंघातून राजीनामा द्यावा लागला. त्यांनी त्रिची ईस्ट मतदारसंघातून राजीनामा दिला आहे. त्यामुळे त्रिची ईस्टसह अण्णा द्रमुकच्या ३ आमदारांनी राजीनामा दिलेल्या मतदारसंघातही पोट निवडणूक होणार आहे.

# प्रतीक्षा नगर डेपोत उभ्या केलेल्या बेस्ट बसला आग

मुंबई

**बेस्टच्या** प्रतीक्षा नगर डेपोत पार्किंग यार्डमध्ये उभ्या असलेल्या एका बसला अचानक आग लागली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

ही बस काल रात्री १०.२० च्या सुमारास डेपोच्या पार्किंग यार्डमध्ये उभी करण्यात आली होती. रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास बसला आग लागल्याचे सुरक्षा रक्षक बिन नवाज यांच्या लक्षात आले. त्यांनी अग्निशामक यंत्र शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीच्या तीव्र ज्वाळांमुळे ते शक्य झाले नाही. यानंतर तत्काळ अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. अग्निशमन दल घटनास्थळी १२.२१ वाजता दाखल झाले. १२.३० वाजेपर्यंत आग आटोक्यात आणण्यात आली. त्यानंतर पोलिसही घटनास्थळी दाखल झाले.

# इंदापुर-दौंडमध्ये पाणी प्रश्न पेटला! सिंचन भवनासमोर 'बोंबाबोंब' आंदोलन

पुणे

**इंदापूर** तालुक्याचा पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून, खडकवासला कालव्याचे हक्काचे पाणी वेळेत न मिळाल्याने ३६ गावांमधील पिके करपून चालली आहेत. याच्या निषेधार्थ इंदापूर, दौंड आणि बारामती तालुक्यातील हजारो संतप्त शेतकऱ्यांनी पुण्यातील सिंचन भवनासमोर जोरदार 'बोंबाबोंब' आंदोलन केले.

आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी आरोप केला आहे की, वेळेत पाण्याचे आवर्तन न सुटल्याने हजारो एकरांवरील ऊस, फळबागा आणि खरीप-रब्बी पिके डोळ्यांदेखत जळून खाक होत आहेत. जलसंपदा विभागाने लेखी आश्वासन देऊनही इंदापूरच्या वाट्याचे पाणी सोडले नाही, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दौंड आणि बारामती तालुक्याला मुबलक पाणी मिळते, मग नेहमी इंदापूर तालुक्यावरच अन्याय का आणि आमचे पाणी कोणी पळवले?

या आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक राजकीय नेतेही शेतकऱ्यांच्या बाजूने मैदानात उतरले होते. यामध्ये माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि दत्तात्रय भरणे हेही सिंचन भवनावरील आंदोलनात सहभागी झाले होते. त्यांनी प्रशासनाला जाब विचारला.

# 'कॉकरोच जनता पार्टी' याचिका सुनावणीस नकार

नवी दिल्ली

**सोशल** मीडियावर सुरू झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' या मोहिमेची सीबीआयमार्फत चौकशी करण्याच्या मागणीच्या याचिकेची तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. भारताचे सरन्यायाधीश सूर्या कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठापुढे ही सुनावणी होणार होती.

याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील एन. के. गोस्वामी यांनी म्हटले की, या मोहिमेमुळे न्यायव्यवस्थेची प्रतिमा खराब होत आहे. त्यावर सरन्यायाधीश सूर्या कांत यांनी म्हटले की, हे इतक्या भावनिक पद्धतीने घेऊ नका.

ही ऑनलाईन मोहीम या महिन्याच्या सुरुवातीला सोशल मीडियावर सुरू झाली होती. विशेषतः तरुणांमध्ये ती वेगाने लोकप्रिय झाली आहे.

१५ मे रोजी सर्वोच्च न्यायालयातील




सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्या कांत यांनी म्हटले होते की, काही बेरोजगार तरुण वकील सोशल मीडिया आणि आरटीआय चळवळी करतात. त्यावेळी त्यांनी काही तरुण कॉकरोचसारखे आहेत असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यावरून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात टीका झाली आणि त्यातून 'कॉकरोच जनता पार्टी' ही व्यंगात्मक ऑनलाईन चळवळ सुरू झाली.

नंतर सरन्यायाधीश सूर्या कांत यांनी स्पष्ट केले की, त्यांचे वक्तव्य हे बनावट पदव्या आणि खोट्या पात्रतेच्या आधारे व्यवसायात येणाऱ्यांविरोधात होते. सर्वसाधारण बेरोजगार तरुणांविरोधात नव्हते. ही मोहीम अमेरिकेतील बोस्टन येथे राहणारे अभिजित दीपके यांनी सुरू केली आहे. बेरोजगारी, संस्थात्मक जबाबदारी आणि माध्यम स्वातंत्र्य यांसारख्या विषयांवर व्यंगात्मक पद्धतीने भाष्य करण्यासाठी या मोहिमेचा वापर केला जात आहे.

इंस्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# कांद्याला ३,००० हमी भाव द्या किसान सभेची मागणी

नवी दिल्ली

**कांद्याच्या** भावात सातत्याने होत असलेल्या घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकरी अक्षरशः हवालदील झाला असून, शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी कांद्याला प्रति क्विंटल ३ हजार रुपये हमीभाव मिळावा. तसेच शेतकऱ्यांना प्रति क्विंटल दीड हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे.

कांद्याचे दर सातत्याने कोसळत असल्याने आणि सरकारने हस्तक्षेप करत शेतकऱ्यांना देऊ केलेली मदत अपुरी असल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदील झाला आहे.कांद्याचा उत्पादन खर्च भरून निघणे तर दूरच. कांद्याला सध्या मिळत असलेला भाव पाहता काढणी, साठवणूक आणि मंडईपर्यंत नेण्याचा खर्चदेखील भरून निघणे कठीण झाले आहे. त्यामुळे सरकारने कांद्याला किमान ३ हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव द्यावा. तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन उपाय योजना कराव्यात. सरकारने बाराशे रुपयांत कांदा खरेदी करण्याची केलेली घोषणा फारशी उपयोगी ठरणारी नाही. त्याऐवजी सरकारने दीड हजार रुपये अनुदान द्यावे, असे किसान सभेचे सचिव अजित नवले यांनी सांगितले.

# मालमत्ता कर थकवणाऱ्या सहारा हॉटेलवर जप्तीची टांगती तलवार

मुंबई

**मालमत्ता** कर थकवल्याप्रकरणी अंधेरी येथील सहारा स्टार हॉटेलवर जप्तीची कारवाई होण्याची शक्यता आहे. तब्बल ४१ कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकीत असल्याने मुंबई महापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे.

उच्च न्यायालयाने यापूर्वी एका महिन्यात २३ कोटी रुपयांचा कर भरण्याचे निर्देश दिले होते. मात्र दोन महिने उलटूनही हॉटेल व्यवस्थापनाकडून एकही रक्कम भरण्यात आलेली नसल्याने महापालिका प्रशासन आता



पुढील कारवाईच्या तयारीत आहे. यापूर्वी थकबाकी वसुलीसाठी महापालिकेने हॉटेलचा पाणीपुरवठा खंडित केला होता. त्याविरोधात हॉटेल व्यवस्थापनाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र न्यायालयाने कर भरण्याचे आदेश दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यानंतर हॉटेलने न्यायालयातील याचिकाही मागे घेतली. महापालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागाचे सहआयुक्त विश्वास शंकरवार म्हणाले की, अंतिम नोटीस देऊनही कर भरला गेला नाही, तर मालमत्ता जप्त करून तिचा लिलाव करण्याची प्रक्रिया राबवली जाईल.

# पुणे विमानतळावर इबोला अलर्ट प्रवाशांचे थर्मल स्क्रिनिंग सुरू

पुणे

**जागतिक** आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) इबोला आजाराबद्दल आणीबाणी घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळावर प्रवाशांचे थर्मल स्क्रिनिंग केले जात असून, कडक सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात आला आहे.

डब्ल्युएचओने १७ मे रोजी बुंदीबुग्यो विषाणुमुळे होणारा इबोला आजार हा आंतरराष्ट्रीय चिंतेचा विषय ठरवून सार्वजनिक आरोग्य आणीबाणी जाहीर केली आहे. त्याला अनुसरून भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुणे विमानतळावर खबरदारीचे उपाय योजले जात असून, सर्व प्रवाशांचे थर्मल स्क्रिनिंग केले जात आहे.

पुणे विमानतळ आरोग्य संस्था आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणाने इमिग्रेशन, सीमाशुल्क आणि विमान सेवा देणाऱ्या समन्वयाने विमानतळावर सुरक्षेचा कडक प्रोटोकॉल लागू केला आहे. यासंदर्भात पुणे विमानतळावर एक उच्चस्तरीय बैठक झाली. त्यानंतर बँकॉक आणि दुबईहून येणाऱ्या सर्व प्रवाशांची काटेकोरपणे तपासणी केली जात आहे.

# आयपीएलमधील 'सलाम मुंबई' घोषणेवर भाजपाचा आक्षेप

**'नमस्कार मुंबई' वापरण्याची मागणी**

मुंबई

**आयपीएल** सामन्यांदरम्यान स्क्रीनवर प्रदर्शित होणाऱ्या 'सलाम मुंबई' या घोषणेवर भाजपाने आक्षेप घेतला आहे. याऐवजी 'नमस्कार मुंबई' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करावा, अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे मुंबई अध्यक्ष दीपक सिंह यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांना पत्र लिहून केली आहे.

त्यांनी पत्रात म्हटले की, मुंबईची ओळख आणि सांस्कृतिक परंपरा लक्षात घेता 'सलाम' या शब्दाऐवजी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मराठी आणि भारतीय संस्कृतीशी सुसंगत असलेले 'नमस्कार' किंवा 'नमस्ते' हे शब्द अधिक योग्य ठरतील. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून, येथील भाषा, संस्कृती आणि अस्मितेचे जतन करणे ही जबाबदारी आहे. त्यामुळे भविष्यात आयपीएल व अन्य क्रिकेट सामन्यांदरम्यान 'सलाम मुंबई'सारख्या घोषणा टाळाव्यात. तसेच मोठ्या स्क्रीनवर 'जय महाराष्ट्र'सारखे संदेश प्रदर्शित केल्यास महाराष्ट्राच्या जनभावना आणि सांस्कृतिक अस्मितेला अधिक योग्य सन्मान मिळेल.


मुंबई क्रिकेट असोसिएशनने या विषयावर गांभीर्याने विचार करून योग्य निर्णय घ्यावा.

# 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या कर्मचाऱ्यांनी संप पुढे ढकलला

मुंबई

**स्टेट** बँक ऑफ इंडिया (एसबीआय) कर्मचाऱ्यांनी आज आणि उद्या जाहीर केलेला दोन दिवसीय देशव्यापी संप पुढे ढकलला आहे. व्यवस्थापन आणि कर्मचारी संघटनांमध्ये झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या दोन्ही दिवशी एसबीआयच्या सर्व शाखांमध्ये नेहमीप्रमाणे कामकाज सुरू राहणार आहे.

ऑल इंडिया स्टेट बँक ऑफ इंडिया स्टाफ फेडरेशन (एआयएसबीआयएसएफ) या संघटनेने एकूण १६ मागण्यांसाठी संपाची हाक दिली होती. यात कर्मचाऱ्यांचे हक्क, वेतनवाढ, तसेच कामाच्या सुधारित अटी यांसारख्या मुद्द्यांचा समावेश होता. याबाबत मुंबईतील एसबीआयच्या कॉर्पोरेट सेंटरमध्ये व्यवस्थापन आणि कर्मचारी प्रतिनिधी यांच्यात बैठक झाली. या बैठकीत विविध प्रलंबित मागण्यांवर चर्चा झाली. ग्राहकांच्या सेवेत अडथळा येऊ नये आणि चर्चेतून मार्ग निघावा, या भूमिकेतून संप पुढे ढकलण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. दरम्यान, २७ आणि २८ मे रोजी बकरी ईदनिमित्त सुट्टी असल्याने काही ठिकाणी बँक कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.



**पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने दादर मार्केटमध्ये लोकांची छत्री खरेदी करण्यासाठी धावाधाव सुरू झाली आहे.** (छाया: दीपक साळवी)

# प्रशिक्षणादरम्यान हँडग्रेनेड स्फोट ४ प्रशिक्षणार्थी पोलीस जखमी

अहिल्यानगर

अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणादरम्यान हँडग्रेनेड (हातबॉम्ब) हाताळण्याचे प्रात्यक्षिक सुरू असताना अचानक स्फोट झाला. या दुर्घटनेत चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत. त्यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांना गंभीर दुखापत झाली आहे.

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर नियमित प्रशिक्षण सुरू होते. यावेळी प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना स्मोक हँडग्रेनेड कसे वापरायचे आणि त्याची हाताळणी कशी करायची, याबाबत मार्गदर्शन केले जात होते. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सुरू असतानाच अचानक संबंधित ग्रेनेडचा हातातच स्फोट झाला. हा स्फोट इतका जोरदार होता की, परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. या दुर्घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यातील दोन जणांच्या हाताच्या करंगळ्या तुटल्याची माहिती आहे. तसेच इतर दोन कर्मचाऱ्यांनाही गंभीर दुखापत झाली आहे. सर्वांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे पोलीस दलात चिंता व्यक्त केली जात असून, प्रशिक्षण प्रक्रियेतील सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

# गुलमर्गमध्ये केबलकारमध्ये अडकलेल्या पर्यटकांची सुटका



श्रीनगर

**जम्मू** आणि काश्मीरच्या गुलमर्गमध्ये तांत्रिक बिघाडामुळे ३०० पर्यटक केबल कारमध्ये अडकले. तांत्रिक दोष दूर करून या प्रवाशांची सुखरुप सुटका करण्यात आली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोंडोला सेवेच्या पहिल्या टप्प्यात हा दोष आढळून आल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून वर जाणारे आणि खाली येणारे दोन्ही मार्ग तत्काळ बंद करण्यात आले. परिणामी, अनेक केबल कार जवळपास एक तास हवेत अधांतरी लटकलेल्या अवस्थेत राहिल्या. त्यानंतर युध्दपातळीवर बचावकार्य हाती घेण्यात आले. आपत्कालीन प्रतिसाद पथके तत्काळ तैनात करण्यात आली. केबल कारमधील सर्व अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी बचाव मोहीम राबवण्यात आली. सर्व पर्यटकांना कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे खाली आणण्यात आल्याची पुष्टी अधिकाऱ्यांनी केली. जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोशल मीडियावर सांगितले की, सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, प्रशिक्षित पथकांनी परिस्थिती कुशलतेने हाताळल्यामुळे घाबरण्याचे काही कारण नाही.

# पुण्यात आजपासून जमावबंदी लागू

पुणे

**पेट्रोल** आणि डिझेलच्या दरवाढीविरोधात शहरातील विविध राजकीय व सामाजिक संघटना आक्रमक होत असताना पुणे प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. उद्या २६ मेपासून ते ८ जूनपर्यंत १४ दिवसांसाठी शहरात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत.

पुणे पोलीस आयुक्तालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, या कालावधीत शहरात कोणत्याही प्रकारचे मोर्चे, आंदोलने, सभा किंवा मिरवणुका काढण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. तसेच पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी तलवार, काठी, लाठी, भाला, बंदूक किंवा इजा करू शकतील, अशा वस्तू बाळगण्यास बंदी असेल. याशिवाय स्फोटक किंवा ज्वलनशील पदार्थ सोबत नेण्यावरही कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. चिथावणीखोर घोषणा देणे, गाणी वाजवणे किंवा सार्वजनिक शांतता भंग होईल असे कोणतेही कृत्य करण्यास मनाई करण्यात आली आहे.